सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पैठणला पेट्रोल पंपावर वाहणांच्या रांगाच रांगा



तभा वृत्तसेवा

पैठण दि २१:- जिह्याभरात सुरु असलेल्या पट्रोल गॅस डिझल इंधनाची टंचाईने पैठणला पेट्रोल व इंधन भरण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केली यामुळे पंपावर वाहणांच्या रांगाच रांगा दिसल्या तर काही पंपावर स्टॉक नसल्याचे फलक लावण्यात आल्याने नागरिकांना मनस्ताप झाला.

प्रमुख तहा शहरांत कावसनकर स्टेडियम जवळ व पन्नालाल नगर येथे पापडीवाल यांचे पंप,पाचोड फाटा चौफुली जवळ पटेल यांचा तर पाटेगांव येथे वरकड यांचा पेट्रोल पंप आहे. नेहमी प्रमाणे इंधन भरण्यासाठी वर्दळ असलेल्या स्टेडियम जवळील पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी खंडोबा मंदिर १ कि. मी.पर्यंत वाहणांच्या रांगा दिसल्या तर पटेल पेट्रोल पंपावर सुद्धा असेच चित्र दिसले. सराफ नगर पंपावर स्टॉक नसल्याचे बोर्ड लावण्यात आले. पाटेगाव पंपावर पेट्रोल,डिझल नो स्टॉक तर गॅस अव्हेलेबल असल्याने त्याठिकाणी ही वाहनांची मोठी गर्दी दिसली. अशीच परिस्थिती पिंपळवाडी, जैन स्पिनर,ढोरकीन,दावरवाडी, पाचोड रोड, आपेगांव रोडवरील पेट्रोल पंपावर दिसली. वाहनात इंधन भरण्यासाठी पंपावर मोठी गर्दी होत आहे. अश्यावेळी सर्वाना इंधन मिळेल यासाठी पुरवठा विघगाने लक्ष देण्याची गरज आहे. त्रिंबक ऑटो पेट्रोल पंपावर थेट टँकर भरून पेट्रोल देण्यात आले.

# चोकअप झाल्याने नवा बंदिस्त नाला उकरला,नाला कामावर प्रश्नचिन्ह

तभा वृत्तसेवा

पैठण दि १९ :- नालीचे घाण पाणी रस्त्यावर वाहत असल्याने दोन वर्षापूर्वी राष्ट्रमाता माँ साहेब जिजाऊ चौक ते कन्या प्रशाळा हा नाला नळकांडी टाकून बंदिस्त करण्यात आला होता. उंची चुकल्याने सदरील बंदिस्त नाला चोकअप झाला असून मान्सून पूर्व कामात आता हा नाला उकरण्यात येत असल्याने बंधीस्त नाला तयार करण्याऱ्या वैष्णवी कंट्रक्शनच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



१२ महिने रस्तावर पाणी वाहणाऱ्या या रस्तावर नागरिकांच्या मागणीपर नगर परिषदेच्या वतीने सदरील नाला बंदिस्त करण्यात आला. अंदाजे दीड कोटी निधी असलेल्या या नाल्याचे काम वैष्णवी कंट्रक्शन या एजन्सीला देण्यात आले. एजन्सीने थातूर मातुर काम करत नाल्याचे बिल काढल्याची चर्चा असतांना उंची चुकल्याने हा बंदिस्त नाला चोकअप झाला आणि रस्त्यावर व परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याने नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसनकर यांच्या सुचनेनुसार हा बंदिस्त नाला उकरण्यात येत आहे. या बंधीस्त नाला कामाबाबत नगर परिषद बांधकाम अभियंता पंकज पवार यांच्याशी संपर्क साधला असता वरील कामाबाबत माहिती घेऊन सांगतो असल्याचे पवार म्हणाले.

# नवनियुक्त सहाय्यक गटविकास अधिकारी अमोल जगताप यांचे स्वागत



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२० मे |** सोयगाव पंचायत समिती येथे नवनियुक्त सहाय्यक गटविकास अधिकारी(ABDO)अमोल जगताप यांचे पंचायत समितीचे सभापती उत्तम चव्हाण व तेजस्विनी काळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ,शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी अमोल जगताप यांना पुढील प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा देत, सोयगाव तालुक्याच्या विकासकामांना अधिक गती मिळेल असा विश्वास व्यक्त केला.नेतृत्व आणि प्रशासन एकत्र आल्यावर विकासाला नवी दिशा मिळते.

या प्रसंगी पंचायत समितीचे माजी सभापती बद्री राठोड, जिल्हा सरचिटणीस सुनील गावंडे,सोयगाव शिवसेना तालुकाप्रमुख दिलीप मंचे (ठाकरे गट),राठोड,रवींद्र पाटील, खरेदी-विक्री संघाचे संचालक मयूर मनगटे,गजानन शिंदे, सीताराम जाधव,संभाजी पवार,नाना शिंदे,विजय गव्हाड तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पैठण तालुक्यात मेडिकल दुकाने कडकडीत बंद

तभा वृत्तसेवा

पैठण दि २० : देशभरातील मेडिकल व्यावसायिकांनी पुकारलेल्या देशव्यापी बंदला पैठण तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ऑनलाइन औषध विक्रीच्या विरोधात तसेच औषध व्यवसायासमोरील विविध समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पैठण मेडिकल असोसिएशनच्या वतीने बुधवारी तालुक्यातील मेडिकल दुकाने कडकडीत बंद ठेवण्यात आली.

या बंदमुळे शहरासह ग्रामीण भागातील शेकडो मेडिकल दुकाने दिवसभर बंद राहिल्याचे चित्र पाहायला मिळाले. औषध विक्री व्यवसायावर ऑनलाइन प्रणालीमुळे मोठा परिणाम होत असून ग्राहकांच्या आरोग्याशीही गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतात, असा आरोप मेडिकल व्यावसायिकांनी केला.



"ऑनलाइन औषध विक्रीमुळे स्थानिक मेडिकल व्यवसायावर मोठा परिणाम होत असून अनेक लहान औषध विक्रेते आर्थिक अडचणीत सापडत आहेत. ग्राहकांना तत्काळ सेवा, योग्य मार्गदर्शन आणि विश्वासार्ह औषधे देण्याचे काम स्थानिक मेडिकल दुकानदार वर्षानुवर्षे करत आहेत. शासनाने ऑनलाइन विक्रीसाठी कठोर नियमावली लागू करून पारंपरिक मेडिकल व्यवसायाचे संरक्षण करणे गरजेचे आहे. मात्र आंदोलन करत असताना रुग्णांची गैरसोय होऊ नये, याचीही आम्ही काळजी घेत आहोत."

— योगेश लोहिया
उपाध्यक्ष, मेडिकल असोसिएशन, पैठण

संभाजीनगर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सहसचिव सुनील देशमुख, पैठण तालुका उपाध्यक्ष योगेश लोहिया, उपाध्यक्ष शिवकांत नवथर, सचिव आनंद थोरात, पैठण शहर व्यापारी महासंघाचे पवन लोहिया, उमेश तट्टू, कुणाल खताडे, सुनील नलभे, जुगलकिशोर लोहिया, गणेश लोहिया, रामेश्वर राठी, रमेश कुलकर्णी,अशोक वाघ, अतुल उपाध्ये, आनंद लोहिया, सचिन लखोटिया आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# ऑनलाईन औषधी विक्रेत्यांचा बंदला सोयगाव येथे बंदला १००% प्रतिसाद



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२० मे |** ऑनलाईन औषधी विक्री बंद करावी व अन्य मागण्यासाठी एक दिवसीय बंद ला सोयगाव येथे चांगला प्रतिसाद मिळाला असून सर्व औषधी दुकाने बंद होती. सकाळ ११ वाजता ऑनलाइन औषधी विक्री बंद करावी तसेच अन्य मागण्याचे निवेदन नायब तहसीलदार राहुल पत्रिके यांना देण्यास आले.यावेळी सोयगाव तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संजय शहापूरकर,दिनेश पंडित,नितीन चव्हाण,अनिकेत सोनवणे, मयुर राऊत,रवींद्र जाधव,परवेझ देशमुख,मंजूर पटेल,साद देशमुख,नावेद देशमुख,विकास मंडवे,गणेश पाटील,अमोल पाखरे,विनोद सोहनी यांच्यासह अनेक औषधी विक्रेते उपस्थित होते.

# भारतीय वनसेवेत निवड झाल्याबद्दल एमजीएममध्ये प्रतीक कुशारे यांचा सन्मान



छत्रपती संभाजीनगर, दि.२० : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या २०१९ बॅचचा माजी विद्यार्थी प्रतीक चंद्रशेखर कुशारे याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या भारतीय वन सेवा परीक्षेत देशपातळीवर १०० वा क्रमांक मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल एमजीएम विद्यापीठात प्रतीक आणि त्यांच्या कुटुंबियांचा विशेष सन्मान करण्यात आला.

प्रतीक कुशारे यांनी मराठी माध्यमातून शालेय शिक्षण पूर्ण केले. कोणत्याही प्रकारच्या कोचिंगशिवाय केवळ स्वयंअध्ययन, मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी हे यश मिळवले आहे. निसर्ग संवर्धनाची आवड आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांच्या बळावर त्यांनी भारतीय वन सेवेसारख्या अत्यंत प्रतिष्ठेच्या सेवेत स्थान मिळवले आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाने नुकतीच 'भारतीय वन सेवा-२०२५'ची अंतिम निवड यादी जाहीर केली असून देशभरातून १४८ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रतीक कुशारे यांनी देशात १०० वा क्रमांक मिळवत छत्रपती संभाजीनगरचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळत आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची आ. सतीश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली खुलताबादच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

खुलताबाद दि २० संतोष करपे आ तथा जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस छत्रपती संभाजी नगर. सतीश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ; खुलताबाद नगर परिषदेचे नगराध्यक्ष अमीर पटेल राष्ट्रवादी काँग्रेस गट नेता गजानन फुलारे यांच्यासह उपस्थित नगरसेवकांनी घेतली भेट



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांची मुंबई येथे भेट घेऊन आ सतीश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत खुलताबाद शहराच्या विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शिष्टमंडळाने घेतलेल्या भेटीत करण्यात आली.

यावेळी विविध विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा करून

. तसेच बारामती मतदारसंघातून प्रचंड मतांनी विजयी झाल्याबद्दल सुनेत्राताई पवार यांचा खुलताबाद येथील भद्रा मारुती ची फोटो फ्रेम देऊन सत्कार करण्यात आला

(राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट व काँग्रेस कमिटीचे नगरसेवक राजकीय वैर विसरून सतीश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शहर विकासाच्या निधीसाठी उपमुख्यमंत्री सुमित्रा अजित पवार यांच्या भेटीला)

या प्रसंगी आ . सना मलिक, नगराध्यक्ष आमेर पटेल, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष व नगर परिषद गटनेते गजानन पाटील फुलारे, नगरसेवक अनिस जहागिरदार, मुनू भाई शेख, ॲड. एस. एम. खमर, काँग्रेस पक्षाचे गटनेते सलीम भाई शेख, तोहसीप भाई शेख, अयाज भाई बेग, कैलास पाटील बारगळ, वाजिद भाई शेख, सलीम भाई जागीरदार, फाहद भाई मोमीन, किरण फुलारे आदी उपस्थित होते

# ५ कोटी रुपयांच्या कर्जांचे वाटप केले जाणार

छत्रपती संभाजीनगर: छत्रपती संभाजीनगर येथे यंग ग्रामप्रेन्युअर विकास कार्यक्रम सुरू करण्यासाठी, भारतीय युवा शक्ती ट्रस्टने (बीवायएसटी) यार्दी सॉफ्टवेअर इंडिया प्रायव्हेट लि.सोबत भागीदारी केली आहे. तरुण आणि महत्त्वाकांक्षी उद्योजकांना शोधून काढणे, त्यांना प्रशिक्षण देणे आणि त्यांना मार्गदर्शन करणे; याद्वारे जिल्ह्याची उद्योजकीय परिसंस्था बळकट करणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. या भागातील बीवायएसटीच्या नऊ वर्षांच्या यशस्वी कामगिरीचा आधार घेत — ज्या कालावधीत संस्थेने १,००० हून अधिक उद्योजकांना पाठिंबा दिला आणि २५,००० हून अधिक तरुणांना प्रशिक्षण दिले — हा नवीन कार्यक्रम १०० तरुण उद्योजकांना मार्गदर्शनासह आणि बँकेशी जोडलेल्या आर्थिक सहाय्यासह मदत करण्यावर, तसेच बीवायएसटीच्या मेन्टॉरिंग इंडिया उपक्रमाद्वारे १५० संस्थात्मक मार्गदर्शकांना प्रशिक्षित करण्यावर लक्ष केंद्रित करेल. या कार्यक्रमाद्वारे जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून ६,४०० तरुणांपर्यंत पोहोचता येईल; १,९०० तरुणांना वैयक्तिक व्यावसायिक समुपदेशन दिले जाईल; आणि ८०० तरुणांना बीवायएसटीचे प्रमाणित स्टेप उद्योजकता प्रशिक्षण दिले जाईल.

# स्कोडा ऑटो इंडियाची 'ट्रॅकवरील श्रेष्ठ' मोहीम सुरू



छत्रपती संभाजीनगर, तभा वृत्तसेवा प्रतिनिधी वाहननिर्माता स्कोडा ऑटो इंडियाने आपल्या वेग, सुरक्षितता आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेचा ठसा उमटवणारी 'ट्रॅकवरील श्रेष्ठ' ही नवी मोहीम सुरु केली आहे. या मोहिमेच्या प्रारंभीच कंपनीने एक विक्रम नोंदवत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये स्थान मिळवले आहे. कोयंबतूर येथील मोटारक्रीडा आणि तांत्रिक प्रशिक्षण केंद्राच्या धावपट्टीवर एकाच उत्पादकाच्या वाहनांचा सर्वात वेगवान बहुवाहन रिले पूर्ण करण्याचा विक्रम स्कोडाने केला.

# झी टीव्हीचा दबदबा कायम; 'वसुधा' आणि 'गंगा माई की बेटियाँ' टॉप-2 मध्ये

छत्रपती संभाजीनगर : हिंदी जनरल एंटरटेनमेंट वाहिनी क्षेत्रात झी टीव्हीने पुन्हा एकदा आपला दबदबा सिद्ध केला आहे. झी टीव्हीवरील 'वसुधा' आणि 'गंगा माई की बेटियाँ' या मालिकांनी टीआरपीच्या शर्यतीत अव्वल दोन स्थानं पटकावत प्रेक्षकांची मोठी पसंती मिळवली आहे. 'वसुधा' ही मालिका सलग दुसऱ्या आठवड्यात 2.0 टीव्हीआरसह पहिल्या क्रमांकावर कायम आहे, तर 'गंगा माई की बेटियाँ'ने 1.7 टीव्हीआरसह दुसरे स्थान मिळवत दमदार कामगिरी केली आहे.



# वारंवार खंडित होणारा पाणीपुरवठा : तातडीने निराकरण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ मे

तालुक्यातील फर्दापूर येथील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेमध्ये वारंवार बिघाड होऊन पाईपलाईन फुटणे, गळती होणे तसेच पाणीपुरवठा खंडित होण्याच्या समस्या निर्माण होत होत्या.यामुळे ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता.या संदर्भात फर्दापूर येथील ग्रामस्थांनी आमदार अब्दुल सत्तार यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे सदरील समस्येबाबत तक्रार केली होती.



ग्रामस्थांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधित यंत्रणेला तातडीने चौकशी समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले होते.त्यानुसार आज तलाठी, ग्रामसेवक तसेच पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांचे पथक फर्दापूर गावात दाखल झाले. या पथकाकडून पाणीपुरवठा व्यवस्थेची पाहणी करण्यात येत आहे.

यावेळी पाईपलाईनमधील तांत्रिक बिघाड, गळती व वारंवार खंडित होणाऱ्या पाणीपुरवठ्याबाबतच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तसेच नागरिकांना सुरळीत व नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

दरम्यान,आमदार अब्दुल सत्तार यांनी ग्रामस्थांच्या तक्रारीची तातडीने दखल घेऊन संबंधित यंत्रणेमार्फत कार्यवाही सुरू केल्याबद्दल फर्दापूर येथील ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# ज्येष्ठ साध्वी ज्ञानमती माताजींकडून डॉ. अंजली पापडीवाल यांना 'अद्वितीय धर्मांजली' उपाधीने सन्मान

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी |** भारतगौरव गणिनी प्रमुख, जैन समाजातील सर्वोच्च व प्राचीन ज्येष्ठ साध्वी परमपूज्य आर्यिका श्री ज्ञानमती माताजी यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. अंजली संजय पापडीवाल (पैठणवाले) यांना अयोध्या येथे 'अद्वितीय धर्मांजली' या मानाच्या उपाधीने सन्मानित करण्यात आले.



परमपूज्य गणिनी प्रमुख आर्यिका श्री ज्ञानमती माताजी यांनी सुमारे पन्नास वर्षांपूर्वी रचलेले 'इंद्रध्वज विधान' पूजन करण्यासाठी पापडीवाल परिवार छत्रपती संभाजीनगरहून अयोध्या येथे गेला होता. हे विधान देशभरातील अनेक मंदिरांमध्ये हजारो वेळा साधू-संतांच्या सान्निध्यात संपन्न झाले आहे.

शाश्वत तीर्थ अयोध्या येथे ज्ञानमती माताजी यांच्या सान्निध्यात हे पूजन होत असताना, रेकी ग्रँडमास्टर, रेकी विषयातील पीएचडी आणि गोल्ड मेडलिस्ट डॉ. अंजली संजय पापडीवाल यांच्या धार्मिक व सामाजिक योगदानाची दखल घेत त्यांना 'अद्वितीय धर्मांजली' ही प्रतिष्ठेची उपाधी बहाल करण्यात आली.

या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. अंजली पापडीवाल म्हणाल्या, "ज्ञानमती माताजींच्या मुखातून ही उपाधी मिळणे माझ्यासाठी अत्यंत भाग्याची आणि अभिमानाची बाब आहे. या सन्मानामुळे मी धन्य झाले." डॉ. अंजली पापडीवाल यांच्या या सन्मानाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

आर्यिका श्री ज्ञानमती माताजी यांनी आतापर्यंत जवळपास साडेपाचशेहून अधिक ग्रंथांची निर्मिती, तसेच मांगी-तुंगी, हस्तिनापूर, कुंडलपूर, शिखरजी, अयोध्या, काकंदी, प्रयाग आदी अनेक तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी मोलाचे कार्य केले आहे. त्या आज जैन समाजातील देशातील सर्वात प्राचीन व विद्वान साध्वी म्हणून ओळखल्या जातात.

# सदगुरु कै.नाईक दादा गुरुजी यांच्या प्रेरनेने व संत श्री आसाराम बापू भक्त परिवाराचे राजेंद्र आहिरे यांनी सुरु केलेल्या मोफत जलसेवेला 25 वर्ष पूर्ण

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२० मे

सोयगाव येथील बसस्थानक परिसरात सदगुरु कै.नाईक दादा गुरुजी यांच्या प्रेरनेने व संत श्री आसाराम बापू यांच्या भक्त परिवारा तर्फे पंचवीस वर्षांपूर्वी मोफत जलसेवा पानपोई सुरु केली. यासाठी भक्त परिवाराचे अध्यक्ष राजेंद्र आहिरे यांनी पुढाकार घेऊन ही सेवा अविरतपणे सुरु ठेवली.सुरुवातीला माठ ठेऊन पानपोई लावली जात असे.आता थंडगार जार चे पाणी ठेवण्यात येते.पूर्वी बऱ्याच ठिकाणी अशा पानपोई असायच्या परंतु आता मात्र पानपोई दिसत नाही.सोयगाव बसस्थानक परिसरात मात्र दरवर्षी उन्हाळ्यात सदगुरु कै.नाईक दादा गुरुजी यांच्या प्रेरनेने व

संत श्री आसाराम बापू साधक परिवारातर्फ मोफत जलसेवा दिली जाते.दरवर्षी विविध मान्यवरांच्या हस्ते पानपोई चे उदघाटन करून अडीच ते तीन महिने ही जलसेवा दिली जाते.सोयगाव येथे तालुक्याच्या ठिकाणी खेड्या पाड्यातुन अनेक महिला पुरुष कामासाठी एस.टी.बसने येतात.तेव्हा थंडगार पाणी पिऊन तहान भागवून पुढे जातात.शाळा महाविद्यालयात येणाऱ्या विदयार्थ्यांना देखील पाणी पिण्याची सुविधा मिळते. बसस्थानक परिसरातील बाजार पेठेत येणाऱ्या ग्राहक देखील या पाणपोईचा लाभ घेतात.मंगळवारी आठवडी बाजारातील दुकानदार व नागरिक देखील येथे पाणी पितात.सोयगाव येथून जाणाऱ्या विविध आगाराच्या बसेस मधून प्रवास करणारे प्रवासी या जलसेवेचा लाभ घेतात. गेल्या पंचवीस वर्षांपासून सुरु असलेली अविरत जलसेवा देणाऱ्या सदगुरु कै.नाईक दादा गुरुजी यांच्या प्रेरनेने व श्री संत आसाराम बापू साधक परिवाराचे व यासाठी पुढाकार घेणाऱ्या राजेंद्र आहिरे यांचे कौतुक अनेक जण करतात.




तहानलेल्या लोकांची तहान भागविणे हिच खरी ईश्वरसेवा मानून सुरु केलेली जलसेवा पंचवीस वर्ष करत आहोत ही आमच्यावर आमचे गुरु संत श्री आसाराम बापू यांची कृपा असून परमेश्वर आमच्यकडून ही सेवा करून घेत आहे.

- राजेंद्र अहिरे,
अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते, सोयगाव

मोफत जलसेवा म्हणजेच पानपोई आता सगळीकडे लुप्त होतांना दिसत आहे.पूर्वी प्रत्येक बस स्टॅन्ड वर लाल रंगाच्या कापड गुडाळलेले माठ दिसायचे आता मात्र सगळीकडे पाण्याच्या बाटल्या दिसतात.सोयगाव ला मात्र सदगुरु कै.नाईक दादा गुरुजी यांच्या प्रेरनेने व श्री संत आसाराम बापू साधक परिवार व राजेंद्र आहिरे यांनी मात्र अविरत व अखंडीत पणे सुरु ठेवलेली ही जलसेवा खरी मानवसेवा आहे.त्यांच्या कार्याचे करावे तितके कौतुक कमीच आहे..

- कुसुम राजू दुतोंडे, नगरसेविका

# ८ हजार ५१५ कोटींच्या वार्षिक पत आराखड्याचे प्रकाशन

## पीक कर्ज, कृषी व एमएसएमई क्षेत्राला प्राधान्य वार्षिक पत आराखड्यात बँकांची १०१ टक्के उद्दिष्टपूर्ती



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा ८ हजार ५१५ कोटी रुपयांचा वार्षिक पत आराखडा (-nnual Credit Plan) जिल्ह-ास्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. जिल्हास्तरीय बँकर्स समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

यावेळी बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री के. के. कनवारिया हे सह-अध्यक्ष म्हणून तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे एलडीओ निशांत यादव, बँक ऑफ महाराष्ट्रचे उपविभागीय प्रमुख जीवन पाटील, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर, श्री. कायंदे, उपनिबंधक पी.बी. वर्खेडे, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे जिल्हा व्यवस्थापक शैलेश चौधरी तसेच विविध बँका व शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी माहिती देतांना बँक ऑफ महाराष्ट्रचे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक मंगेश केदार यांनी सांगितले की, मागील वर्षीचा पत आराखडा ७ हजार ७७० कोटी रुपयांचा होता. त्याच्या तुलनेत यंदाच्या आराखड्यात सुमारे १० टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. या पत आराखड्यात प्राधान्य क्षेत्र कर्जवाटपासाठी ५ हजार ५१५ कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये पीक कर्जासाठी १ हजार ८२० कोटी रुपये तर कृषी क्षेत्रासाठी एकूण ३ हजार ०५२ कोटी रुपयांचा समावेश आहे. तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) क्षेत्रासाठी २ हजार २२० कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

बैठकीच्या प्रारंभी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजनांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखा व्यवस्थापकांचा जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मागील आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील कामगिरीचा आढावा घेताना, वार्षिक पत आराखड्यांतर्गत बँकांनी ४ हजार ८७० कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या तु-लनेत ४ हजार ९०१ कोटी रुपयांचे कर्जवाटप करून १०१ टक्के उद्दिष्टपूर्ती साधल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी चालू आर्थिक वर्षात पीक कर्ज उद्दिष्टपूर्तीकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना बँकांना दिल्या. प्रस्तावित कर्जमाफी योजनेच्या पार्श्वभूमीवर सर्व बँकांनी आवश्यक तयारी ठेवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच उचएऋझ व झचऋवए योजनांतील प्रस्ताव किरकोळ कारणांमुळे नामंजूर न करता अर्जदारांना योग्य मार्गदर्शन करून प्रस्ताव लवकर मंजूर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. बैठकीदरम्यान उचएऋझ योजनेंतर्गत जवळपास ८० टक्के प्रस्ताव नामंजूर होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यावेळी एचडीएफसी बँक तसेच इतर बँकांच्या प्रतिनिधींनी जिल्हा उद्योग केंद्राने प्रस्ताव बँकांकडे पाठविण्यापूर्वी त्यांची योग्य छाननी करावी, असे मत व्यक्त केले. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी खासगी बँका व जिल्हा उद्योग केंद्र यांनी समन्वयाने बैठक घेऊन नामंजुरीचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

मत्स्यव्यवसाय व दुग्ध व्यवसायासाठी किसान क्रेडिट कार्ड (घउउ) वितरणाबाबतही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. मत्स्य विभाग व दुग्ध विकास विभागाने बँकांच्या समन्वयाने विशेष शिबिरे आयोजित करून या क्षेत्रातील लाभार्थ्यांना अधिकाधिक प्रमाणात केसीसीचा लाभ मिळवून द्यावा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

युनियन बँक ऑफ इंडिया, रामनगर शाखेमधील मत्स्यव्यवसाय केसीसी खात्यांतील थकीत व नूतनीकरण प्रलंबित प्रकरणांचे प्रमाण अधिक असल्याचा मुद्दाही बैठकीत चर्चिला गेला. त्यावर सहाय्यक मत्स्य आयुक्तांनी संबंधित बँकांना केसीसी वसुलीसाठी सहकार्य करावे तसेच प्रलंबित खात्यांच्या नूतनीकरणासाठी समन्वय साधावा, असे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिले.

## संक्षिप्त

### विवेकानंद सेवा केंद्राचे शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये घवघवीत यश




**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे , यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विवेकानंद सेवा केंद्र परतुर संचलित विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर, विवेकानंद पब्लिक स्कूल परतुर, विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक शाळा परतुर, विवेकानंद इंग्लिश स्कूल केंधळी मंठा, अशा ४ शाळेचे एकूण ४२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये,विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले असून केंद्राच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे.

या परीक्षामध्ये एकूण ४२विद्यार्थी पात्र ठरले असून विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक व संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव व शिक्षकांचे परिश्रम यामुळे हे यश मिळाले असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर एस.जी.बाहेकर साहेब, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक संदीप दादा बाहेकर, शाळेच्या मुख्याध्यापिका आदरणीय श्रीमती. शिंदे मॅडम, प्रिन्सिपल महाजन सर, दंदाले सर ,विष्णू बाहेकर सर्व शिक्षक वृंद,सर्व पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच पुढील शैक्षणिक वाटचा-लीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकवृंद, पालक व संस्थेचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे मत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून विवेकानंद सेवा केंद्राचे कौतुक करण्यात येत आहे.

### मार्च २०२६ मधील गारपीट व अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना २ कोटी ५२ लाखांची मदत मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात मार्च २०२६ दरम्यान झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने जालना जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांसाठी तब्बल रु. २ कोटी ५२ लाख ८९ हजार २९० इतक्या निधीस मंजुरी दिली असून, हा निधी तातडीने वितरित करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. जिल्ह्यातील सहा तालुक्यांतील एकूण २,८५७ शेतकरी या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाले आहेत. सुमारे १४९८.३० हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले असून त्यासाठी शासनाकडे प्रपत्र अ, ब, क आणि ड अहवाल सादर करण्यात आले होते. शासन निर्णय क्रमांक सीएलएस २०२६ / प्र.क्र. ७६ (भाग-८) / मदत-१ (म-३), दिनांक १८ मे २०२६ अन्वये संबंधित निधीस मंजुरी देण्यात आली आहे. तालुकानिहाय नुकसान व मंजूर निधीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

जालना तालुका :२७३ शेतकरी बाधित, १४८ हेक्टर क्षेत्र नुकसानग्रस्त, अपेक्षित निधी रु. २५.१६ लाख, बदनापूर तालुका :१२५९ शेतकरी बाधित, ६१७.१० हेक्टर क्षेत्र बाधित, अपेक्षित निधी रु. १ कोटी ५ लाख ५२ हजार ३००, भोकरदन तालुका :१९८ शेतकरी बाधित, ६५.८० हेक्टर क्षेत्र नुकसानग्रस्त, अपेक्षित निधी रु. ९ लाख ६ हजार १००, जाफ्राबाद तालुका :२ शेतकरी बाधित, १ हेक्टर क्षेत्र बाधित, अपेक्षित निधी रु. २० हजार १९०, मंठा तालुका :१५३ शेतकरी बाधित, ६५.९० हेक्टर क्षेत्र नुकसानग्रस्त, अपेक्षित निधी रु. १० लाख ४० हजार ४००, घनसावंगी तालुका :९७२ शेतकरी बाधित, ६००.५० हेक्टर क्षेत्र बाधित, अपेक्षित निधी रु. १ कोटी २ लाख ५४ हजार ३०० प्रशासनाने संबंधित महसूल व कृषी विभागाला शासन निर्णयातील तरतुदींनुसार पात्र शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच निधी वितरणाचा अहवाल त्वरित जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचे आदेशही निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी दिले आहेत.

## महाराष्ट्र विधान परिषदेवर सतीश घाटगेंना भाजपाने संधी द्यावी

### पदाधिकाऱ्यांनी घेतली माजी मंत्री दानवे, आ.लोणीकर यांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**वडीगोद्री । प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधान परिषदेमधील रिक्त असलेल्या १७ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीची घोषणा झाली आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघातून घनसावंगी विधानसभेचे निवडणूक प्रमुख तथा समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांना उमेदवारी देण्याची आग्रही मागणी भाजपचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधून जोर धरू लागली आहे. या संदर्भात कार्यकर्त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे जोरदार फिल्डिंग लावली असून वरिष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली आहे.

मंगळवारी जालना जिल्ह्यातील भाजपचे प्रमुख कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांची भेट घेतली. छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात सतीश घाटगे पाटील यांनी केलेले संघटनात्मक काम आणि त्यांची जनसामान्यांतील पकड लक्षात घेता, पक्षाने त्यांना यावेळी विधान परिषदेवर संधी द्यावी, अशी आग्रही मागणी कार्यकर्त्यांनी या नेत्यांकडे केली. तसेच स्थानिक कार्यकर्त्यांच्या या तीव्र भावना पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांपर्यंत पोहचवून सतीश घाटगे पाटील यांच्या नावाचा सकारात्मक विचार करावा, अशी विनंतीही यावेळी करण्यात आली. घनसावंगी विधानसभेतील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते लवकरच रावसाहेब पाटील दानवे यांची देखील या संदर्भात भेट घेणार आहेत. सतीश घाटगे पाटील यांनी समृद्धी साखर कारखान्याच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात आणि घनसावंगी विधानसभा मतदारसंघात भाजपचे संघटन मजबूत करण्यात मोठे योगदान दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सव घटकांना सोबत घेऊन चालणार चेहरा म्हणून कार्यकर्त्यांमध्य त्यांच्या नावाची मोठ उत्सुकता आहे. निवडणुकीची घोषणा होताच कार्यकर्त्यांन दाखवलेल्या या तत्परतेमुळे आणि ज्येष्ठ नेत्यांच्या घेतलेल्या भेटींमुळे संभाजीनगर मतदारसंघातील राजकीय घडामोडींना आता वेग आला आहे.

## परतूर-सेलू मार्गावरील प्रत्येक गावांजवळ गतिरोधक बसवा

### विजय चव्हाण यांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

परतूर ते सेलू या मुख्य मार्गाचे काम नुकतेच पूर्ण झाले असून, रस्ता अत्यंत चांगला आणि सरळ झाल्यामुळे या मार्गावरील वाहनांचा वेग प्रचंड वाढला आहे. वाढलेल्या वेगीशलीकरणामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या मार्गावरील गावांच्या हद्दीत तात्काळ गतिरोधक (स्पीड ब्रेकर) व वाहतूक सूचना फलक लावण्यात यावेत, अशी मागणी भाजप युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष विजय रमेशराव चव्हाण यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भात त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपकार्यकारी अभियंत्यांना मंगळवारी (दि. १९ मे) लेखी निवेदन सादर केले.

दिलेल्या निवेदनात चव्हाण यांनी नमूद केले आहे की, रस्ता गुळगुळीत झाल्याने वाहने सुसाट धावत आहेत. त्यामुळे रस्त्याशेजारील विविध गावांजवळ वारंवार लहान-मोठे अपघात घडत आहेत. सामान्य नागरिक, शाळकरी विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांना हा रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून चालावे लागत असून मोठा धोका निर्माण झाला आहे. सध्या देवगाव फाटा ते सेलू या मार्गाचे काम सुरू असल्याने, त्या मार्गावरील बरीचशी अतिरिक्त वाहतूक देखील याच परतूर-सेलू रस्त्यावरून वळवण्यात आली आहे. परिणामी, या मार्गावर वाहनांची वर्दळ आणि ताण कमालीचा वाढला असून परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. परतूरपासून ते सातौना खुर्द पर्यंत या मार्गावर येणाऱ्या सर्व गावांच्या हद्दीजवळ तात्काळ गतिरोधक बसवण्यात यावेत. तसेच वाहनचालकांना पूर्वकल्पना मिळण्यासाठी आवश्यक ते वाहतूक सूचना फलकही लावण्यात यावेत, जेणेकरून वाहनांचा वेग नियंत्रणात राहील आणि संभाव्य अपघात टळू शकतील, अशी मागणी चव्हाण यांनी केली आहे. या गंभीर बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी, अशी आग्रही विनंतीही त्यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी कार्यकारी अभियंता (जालना), उपविभागीय अधिकारी (परतूर), तहसीलदार, पोलीस निरीक्षक आणि नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना देखील पाठवण्यात आल्या आहेत.

### जालन्याचा 'शाकाहारी आयर्नमॅन' कैलास झोळगेंची ऐतिहासिक कामगिरी

## कैलास झोळगे यांच्या यशामुळे तरुणांना प्रेरणा मिळेल -माजी आ.कैलास गोरंटयाल

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनीधी**



व्हिएतनाम मधील 'द नांग' शहरात दि.१० मे २०२६ रोजी पार पडलेल्या जागतिक आयर्नमॅन ट्रायथलॉन १४०.६ मैल स्पर्धेत जालन्याचे सुपुत्र कैलास गजानन झोळगे यांनी भारताचे प्रतिनिधित्व करत ऐतिहासिक कामगिरी बजावली असून संपूर्ण मराठवाड्याचे नाव जागतिक स्तरावर पोहोचवले आहे. त्यांनी तब्बल २२६ किमीचे अत्यंत खडतर अंतर अवघ्या १५ तास २३ मिनिटे ५५ सेकंदांत पूर्ण करून जालना जिल्ह्यातील पहिले 'पूर्ण आयर्नमॅन' होण्याचा मान पटकावला आहे. ही स्पर्धा जगातील सर्वात कठीण सहनशक्ती स्पर्धांपैकी एक मानली जाते. यात समुद्रात पोहणे, सायकलिंग आणि मॅरेथॉन धावणे अशा तिहेरी आव्हानांचा समावेश असतो. कैलास झोळगे यांनी अत्यंत जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या बळावर हे आव्हान यशस्वीरीत्या पूर्ण केले. विशेष म्हणजे, पूर्णतः शाकाहारी जीवनशैली अंगीकारून आणि कोणतेही सप्लिमेंट न घेता त्यांनी ही अविस्मरणीय कामगिरी करून दाखवली आहे.

'शाकाहारी आयर्नमॅन' म्हणून कैलास झोळगे यांनी तरुणांसमोर जिद्द, शिस्त आणि आत्मविश्वासाचा आदर्श निर्माण केला असून, त्यांच्या या यशामुळे अनेक युवकांना नव्या उमेदीची प्रेरणा मिळेल असा आशावाद जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला.या यशाबद्दल माजी आमदार गोरंटयाल यांनी झोळगे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेची सुरुवात सकाळी ६:३५ वाजता पोहण्याच्या टप्प्याने झाली. कैलास झोळगे यांनी १ तास १६ मिनिटे ५९ सेकंदांत पोहण्याचा टप्पा पूर्ण केला. त्यानंतर ७ तास ३२ मिनिटे ५२ सेकंदांत सायकलिंगचा टप्पा यशस्वीपणे पार करत त्यांनी मॅरेथॉन धाव पूर्ण करून अखेर आयर्नमॅनचा बहुमान पटकावला. यापूर्वीही त्यांनी गुजरात येथील ओशियन राष्ट्रीय खुल्या जलतरण स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत १५ किमी स्विमिंग करून द्वितीय क्रमांक मिळवला होता. तसेच कोल्हापुरात झालेल्या हाफ आयनमॅन लोहपुरुष ट्रायथलॉन मध्येही त्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करून आपली वेगळी ओळख निर्माण केली होती.आपल्या विजयानंतर भावना व्यक्त करताना कैलास झोळगे म्हणाले की, १५:२३:५५ तासांत २२६ किमी पूर्ण केलापण खरा फिनिश लाईन तुमचा अभिमान होता. मेडल घरी येईल, पण तुमचं प्रेम मनात कायम राहील. हा आयर्नमॅन फक्त माझा नाही संपूर्ण मराठवाड्याचा असल्याची भावना कैलास झोळगे यांनी व्यक्त केली. या ऐतिहासिक यशामुळे जालना जिल्ह्यासह मराठवाडा आणि महाराष्ट्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दरम्यान, सोमवारी रात्री त्यांचे जालन्यात आगमन होताच क्रीडाप्रेमी जनतेने केला झोळगे यांचे जल्लोषात स्वागत केले.या यशामुळे मराठवाड्याच्या क्रीडा क्षेत्रात एक नवीन इतिहास रचला गेल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



## तलवार बाळगणाऱ्या दोघांवर पोलीसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालन्यातील एमआयडीसी भागात अवैध रित्या धारदार शस्त्र तलवार बाळगुन दहशत निर्माण करत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांना मिळाल्याने पोलीस स्टेशनचे अंमलदार एमआयडीसी भागातील आयकॉन स्टिल चौकात आरोपी नामे सय्यद साबेर सय्यद निसार वय २२ वर्षे रा. नुतन वसाहत जालना हा धारदार तलवार हातात घेवुन जोरजोरात आरडा ओरडा करुन दहशत माजवत होता त्यास ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातील तलवार जप्त करुन त्याच्या विरुध्द पोलीस अंमलदार रवि देशमुख यांचे फिर्यादवरुन कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस अंमलदार प्रशांत देशमुख हे करीत आहे. तसेच दि.१७/०५/२०२६ रोजी चंदनझिरा भागातील पदमावती नगर येथे एक बालअपचारी हा तलवार बाळगत असल्याची माहिती मिळालेवरुन पो.स्टे पथकाने जावुन त्याच्या ताब्यातील एक धारदार तलवार जप्त करुन सदर विधीसंघर्ष बालअपचारी याचे विरुध्द पोउपनि स्कॉट यांचे फिर्याद वरुन गुन्हा दाखल केला आहे सदर गुन्हयाचा तपास पोलीस अंमलदार संतोष वनवे करीत आहे. सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक श्री. तेगबिर सिंह संधु साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नितीन कटेकर साहेब यांचे म र्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब पवार पोलीस ठाणे चंदनझिरा यांचे नेतृत्वात पो. स्टे चंदनझिराचे पोउपनि मारीयो स्कॉट, पोउपनि सय्यद सपोउपनि मनसुब वेताळ, पोहेकॉ प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, रविंद्र देशमुख, सागर खैरे यांनी केली आहे.

## सोशल मिडीयावर धारदार शस्त्राचे रिल्स बनवून समाजामध्ये दहशत माजविणाऱ्यास कदीम जालना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

दिनांक २० मे रोजी दुपारी १४:१५ वाजताचे सुमारास पोलीस ठाणे कदीम जालनाचे पथक हददीत पेट्रोलिंग करीत असतांना पथकास गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सोशल मिडीयावर धारदार शस्त्राचे रिल बनवुन समाजामध्ये दहशत निर्माण करणारा इसम हा कदीम जालना पोलीस ठाणे हददीत देहकरवाडी माळीपुरा जुना जालना या भागात हातात धारदार कोयता बाळगुन फिरत आहे. असे गोपनिय माहिती मिळाल्यावरुन पथकाने सदरची माहीती मा.पो.नि.शेवाळे सो. कदीम जालना यांना कळवून त्यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली दोन पंचासह सदर ठिकाणी पाहणी केली असता



दुपारी ०२:३० वाजता एक इसम हा संशियीत रित्या फिरत असतांना दिसुन आला व तो पथकास पाहुन पळत असतांना त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारले असतां त्याने त्याचे नाव अजय गणेश खरात वय २२ वर्षे रा. लक्कडकोट संभाजी नगर नवा जालना असे असल्याचे सांगितले तेंव्हा दोन पंचासमक्ष त्याचे हातातील कोयता ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता त्याचे शर्टाचे आत मध्ये पाठीमागील बाजुस एक धारदार खंजीर मिळुन आला. यामध्ये ७००/- रुपये किंमतीचा एक लोखंडी स्टील, बनावटीचे चमकदार पात्याचे, एका बाजुस धारदार व पुढील बाजुस टोकदार असलेला किंचित वाकडया आकाराचा लाकडी मुठ असलेला खंजीर ज्याची मुठेसह अंदाजे लांबी ३५ से.मी. असलेला जु.वा. किं.अं.असलेला तसेच ५००/-रुपये किमंतीचा एक लोखंडी बनावटीचा, गंज लागलेला एका बाजुस धारदार पाते असलेला पुढील बाजुस अर्धगोलाकार व वाकडया आकाराचा पाठीमागील भाग सरळ व पुढील टोक वाकडे असलेला ज्यास लाकडी मुठ असलेला कोयता ज्याची मुठेसह अंदाजे लांबी ५१ से.मी. अस-लेला जु.वा.कि. अं. असलेला. असा एकुण १,२००/- रुपये किंमतीचा मुददेमालासह विना परवाना बेकायदेशिररित्या ताब्यात घेवुन फिरत असतांना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे कडे चौकशी केली असता त्याचेवर पो-लीस ठाणे सदर बाजार येथे गु.र.न. १५८/२०२६ कलम १०९, १२६ (२), ३२४(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात तो फरार असल्याचे निष्पन्न झाला आहे. सदर आरोपी विरुध्द पोलीस ठाणे कदीम जालना येथे गु.र.न.२५४/२०२६ कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा १९५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा.पो-लीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, उपविभागिय पोलीस अधीकारी कुलकर्णी उपविभाग जालना यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांचे नेतृत्वाखाली पोहेकॉ सदा राठोड, पोहकों सचिन चौधरी पोकॉ मतीन शेख, दिलीप गायकवाड, पोकॉ इम्रान खान, यांनी केली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास कदीम जालना पोलीस ठाषो कडुन चालु आहे.

# संपादकीय

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# वाघिणीच्या दुधाचा बाजार

आजच्या काळात शिक्षण ही केवळ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया राहिलेली नाही; ती मोठी बाजारपेठ बनलेली आहे. मोठ्या शहरापासून खेड्यापाड्यांपर्यंत सर्वत्र कोचिंग क्लासेस, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, करीअर अकॅडमी आणि ऑनलाईन कोर्सेसची अक्षरशः दुकाने उभी राहिली आहेत. ज्या शिक्षणाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वाघिणीचे दूध म्हटले होते, त्याच दुधाचा थेट बाजार मांडला गेला आहे. एकेकाळी व्रत समजल्या जाणाऱ्या या क्षेत्रात आता सामाजिक बांधिलकीपेक्षा नफा, ब्रॅण्ड आणि स्पर्धेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या व्यापारीकरणाला बळ दिले ते राजकीय पुढाऱ्यांनी आणि धनदांडग्या पालकांनी. त्यामुळेच ज्याच्याकडे पैसा असेल, त्यालाच अधिक चांगल्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. परिणामी शिक्षण हे समानतेचे मूल्य रुजविणाऱ्या समाजासाठी वापरावयाचे माध्यम न राहता आर्थिक विषमतेचे प्रतीक बनले आहे. 'नीट' परीक्षेतील सध्याचा गोंधळ हे त्याचे अगदी ठळक उदाहरण.

गेल्या काही वर्षांत देशाच्या शिक्षणव्यवस्थेवर सर्वाधिक घाव घातला तो नीट परीक्षेच्या प्रयोगाने. देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य ठरवणारी ही परीक्षा आता गुणवत्ता, पारदर्शकता आणि समान संधीचे प्रतीक राहिलेली नाही; उलट ती आर्थिक विषमता, खाजगीकरण आणि शैक्षणिक बाजारपेठेचा विद्रूप चेहरा बनली आहे. विशेष म्हणजे या संपूर्ण प्रक्रियेच्या केंद्रस्थानी महाराष्ट्र राहिला आहे. कारण देशातील सर्वाधिक खाजगी वैद्यकीय महाविद्यालये, कोचिंग क्लासेसच्या धंद्याचे जाळे, शिक्षणसम्राटांचे राजकारण आणि सत्तेचा हस्तक्षेप महाराष्ट्रात अधिक आहे. महाराष्ट्रात एकेकाळी सरकारी वैद्यकीय शिक्षणाची समृद्ध परंपरा होती. पुणे, मुंबई, नागपूर, संभाजीनगरसारख्या शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी देशाला उत्कृष्ट आणि संवेदनशील डॉक्टर दिले. डॉक्टर होणे म्हणजे समाजसेवा ही भावना तेव्हा शिक्षणातून रुजत होती. मात्र गेल्या दोन-अडीच दशकांत शिक्षणाच्या खाजगीकरणाने इतका आक्रमक वेग घेतला की, वैद्यकीय शिक्षण हे सेवाभावी क्षेत्र न राहता थेट धंदेवाईक पद्धतीचे क्षेत्र बनले. शिक्षणसंस्था ज्ञानमंदिरांपेक्षा आर्थिक साम्राज्यांचे केंद्र बनल्या. लाखो रुपयांची फी, डोनेशन, व्यवस्थापन कोटा आणि प्रवेश प्रक्रियेतील व्यवहार यामुळे गुणवत्तेपेक्षा पैशाला अधिक महत्त्व मिळू लागले. सर्वांत धोकादायक गोष्ट म्हणजे शिक्षण क्षेत्र आणि राजकारण्यांचे अभद्र नाते. महाराष्ट्रातील अनेक वैद्यकीय महाविद्यालये थेट राजकीय नेत्यांच्या संस्थांच्या ताब्यात आहेत. एकीकडे सरकार सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या अपुरी ठेवते, तर दुसरीकडे खाजगी संस्थांना परवानगी मिळत असते. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांसमोर पर्याय उरतो तो फक्त प्रचंड शुल्क भरून शिक्षण घेण्याचा. सामान्य शेतकरी, कामगार किंवा मध्यमवर्गीय कुटुंबासाठी हे शुल्क म्हणजे आयुष्यभराचे कर्ज असते. शिक्षणाचे बाजारात रूपांतर झाले की, गुणवत्ता तर संपतेच, शिवाय माणुसकीही हरते. लाखो रुपये खर्च करून डॉक्टर बनणारा विद्यार्थी पुढे ते पैसे वसूल करण्याचाच विचार करतो. परिणामी, आरोग्य व्यवस्थाही व्यापारी बनते. रुग्ण हा माणूस न राहता ग्राहक बनतो आणि उपचार ही सेवा न राहता व्यवहार ठरतो. म्हणूनच शिक्षणातील व्यापारीकरणाचा परिणाम केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण समाजव्यवस्थेवर होतो. 'नीट'चा मूळ उद्देश काय होता? देशभरातील वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया एकसमान करणे, गुणवत्तेला प्राधान्य देणे आणि भ्रष्टाचार रोखणे. प्रत्यक्षात झाले नेमके उलटे. ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेपेक्षा त्यांच्या आर्थिक क्षमतेची चाचणी घेणारी ठरत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, मराठी माध्यमातील विद्यार्थी, राज्य मंडळातील विद्यार्थी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुले या व्यवस्थेत अक्षरशः चिरडली जात आहेत. प्रश्न फक्त एका परीक्षेचा नाही; प्रश्न संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचा आहे. शिक्षण हा मूलभूत हक्क की विक्रीयोग्य वस्तू (कमोडिटी) म्हणून दुकानाच्या शोकेसमध्ये ठेवले गेले आहे. उदारीकरणानंतर शिक्षण क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले गेले. सुरुवातीला खाजगी शिक्षणाला पर्यायी व पूरक म्हटले गेले; पण हळूहळू सरकारी शिक्षणाची उपेक्षा करून खाजगी शिक्षणालाच मुख्य प्रवाह बनवण्यात आले. महाराष्ट्रात ही प्रक्रिया अधिक वेगाने झाली. परिणामी सरकारी शाळा आणि महाविद्यालयांची अवस्था दयनीय होत गेली, तर खाजगी संस्थांचे साम्राज्य फोफावले. या संपूर्ण प्रक्रियेत सर्वांत मोठे नुकसान झाले ते सामाजिक न्यायाचे. संविधानाने शिक्षणाला समान संधीचे साधन मानले होते. आज परिस्थिती अशी आहे की, गरीब विद्यार्थ्याला गुणवत्तेपेक्षा आर्थिक परिस्थितीमुळे मागे पडावे लागते. ग्रामीण भागातील बुद्धिमान विद्यार्थी कोचिंगच्या अभावामुळे स्पर्धेतून बाहेर फेकला जातो. हा सामाजिक अन्याय आहे. महाराष्ट्राने एकेकाळी शिक्षण क्षेत्राला पुरोगामी विचार दिला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे शस्त्र मानले. त्यांनी शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी संघर्ष केला. आज त्याच महाराष्ट्रात एकूण शिक्षण आणि त्यातही वैद्यकीय शिक्षण मोजक्या श्रीमंतांच्या ताब्यात गेले आहे. शिक्षणातील विषमता वाढली की समाजातील आर्थिक आणि सामाजिक दरीही वाढत असते. नीट परीक्षेच्या नावाखाली जो ताण निर्माण केला जातो, त्यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या लाखो मुलांवर स्पर्धेचे प्रचंड ओझे आहे. शिक्षण हा आनंदाचा प्रवास न राहता भीती, ताण आणि असुरक्षिततेचा खेळ बनला आहे. पालकांच्या अपेक्षा, कोचिंग क्लासेसची अतिरेकी स्पर्धा, दिवसाला दहा-दहा तास अभ्यास आणि अपयशाची भीती, या सगळ्यांत विद्यार्थी मानसिकदृष्ट्या कोलमडत आहेत. कोटा, पुणे, लातूर यासारख्या शिक्षण केंद्रांमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटना ही त्याची जिवंत उदाहरणे आहेत. तेवढेच धक्कादायक असे की, या व्यवस्थेत शिक्षक आणि शिक्षणसंस्थाच संशयाच्या भोवऱ्यात सापडत आहेत. दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर येथून आरोपींना अटक होणे, त्यात प्राध्यापक, शिक्षिका आणि क्लासचालकांचा समावेश असणे. हे सारे अत्यंत लाजिरवाणे आणि महाराष्ट्राच्या परंपरेला काळे फासणारे आहे. ज्यांच्या हातात विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित असावे, तेच जर पैशासाठी प्रश्नपत्रिका, गैरव्यवहार करत असतील तर शिक्षण नावाच्या वाघिणीच्या दुधाचा बाजार कोणत्या थराला गेलाय याचा विचारही करता येत नाही. शिक्षक हे ज्ञान, प्रामाणिकपणाच्या मूल्यांचे प्रतीक मानले जातात. पण पैशाच्या हव्यासापोटी काही शिक्षक कोणत्याही थराला जाण्यास तयार होतात, तेव्हा शिक्षणव्यवस्थेवरील विश्वासच डळमळीत होतो. हे भविष्यातील पिढ्यांसाठी अत्यंत धोकादायक आहे. विद्यार्थ्यांना पुस्तकांमधून जितके शिक्षण मिळते, त्याहून अधिक ते शिक्षकांच्या वर्तनातून शिकत असतात. शिक्षणाच्या मंदिरातच व्यवहार, भ्रष्टाचार आणि पैशांचा खेळ सुरू झाला, तर विद्यार्थ्यांच्या मनात प्रामाणिकपणाचे मूल्य रुजणार कसे? शिक्षणव्यवस्थेतील हा संपूर्ण गोंधळ केवळ 'नीट' परीक्षेचा किंवा काही गैरव्यवहारांचा प्रश्न नाही; तर तो समाजाच्या बदललेल्या प्राधान्यक्रमांचा आरसा आहे. आपण शिक्षणाला ज्ञान, विवेक आणि सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून पाहणे सोडले आणि ते प्रतिष्ठा, पैसा व स्पर्धेच्या शर्यतीचे साधन बनवले. त्यामुळे आज विद्यार्थी डॉक्टर कसे व्हायचे, हे शिकत आहेत; पण डॉक्टर का व्हायचे, हा मूलभूत प्रश्न बाजूला पडला आहे. कोणतीही शिक्षणव्यवस्था केवळ पदव्या देऊन समाज घडवत नाही; तर ती समाजाची नैतिक दिशा ठरवत असते. त्यामुळे आज गरज आहे ती केवळ परीक्षा पद्धती बदलण्याची नाही, तर शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची. शिक्षण हे बाजारपेठेच्या तत्त्वांवर चालणारे उत्पादन नसून लोकशाही टिकवणारी व ती बळकट करणारी सामाजिक प्रक्रिया आहे, ही जाणीव पुन्हा निर्माण करावी लागेल. अन्यथा उद्या अशी वेळ येईल की, शिक्षण संस्थांच्या भव्य इमारती असतील, तंत्रज्ञान आधुनिक असेल; पण त्या व्यवस्थेत माणुसकी, समानता आणि नैतिकता राहणार नाही. शिक्षण जर बाजाराच्या पद्धतीने चालू राहिले तर लोकशाही देखील धनदांडग्यांच्याच ताब्यात जाणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. वेळ कमी उरलाय. सावरायचे तर सरकारला आणि समाजालाही सावरावे लागेल.

## विशेष

# इटली आणि भारत : भारत-भूमध्य सागरीय संबंधांसाठी सामरिक भागीदारी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांचा लेख**

भारत आणि इटली यांच्यातील संबंध आता एका निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहेत. अलिकडील वर्षांमध्ये आमच्यातील बंध एका अभूतपूर्व गतीने दृढ झाले असून या मैत्रीपूर्ण संबंधांचे रूपांतर स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या मूल्यांमध्ये रुजलेल्या आणि भविष्यासाठीच्या समान दृष्टिकोनावर आधारित धोरणात्मक भागीदारीत झाले आहे.

आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन होत असताना भारत आणि इटली यांच्यातील भागीदारीला उच्चस्तरीय राजकीय आणि संस्थात्मक संवादांद्वारे मार्गदर्शन लाभले आहे आणि या भागीदारीला एक नवीन आणि उच्च पैलू देखील प्राप्त झाला असून आमची आर्थिक गतिशीलता, सामाजिक सर्जनशीलता आणि हजारो वर्षांपासूनच्या संस्कृतीचे ज्ञान यांचा संगम झाला आहे. आमचे सहकार्य हे आपल्या सामायिक जाणिवेचे प्रतिबिंब आहे की, २१व्या शतकातील समृद्धी आणि सुरक्षितता या राष्ट्रांच्या नवोन्मेष क्षमतेवर, ऊर्जा संक्रमणाचे व्यवस्थापन करण्याच्या कौशल्यावर आणि धोरणात्मक सार्वभौमत्व अधिक बळकट करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असेल. यासाठी आम्ही आमचे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ आणि विविधतेने समृद्ध करण्यास कटिबद्ध आहोत, जेणेकरून नवीन उद्दिष्टांचा पाठपुरावा करता येईल आणि परस्परपूरक सामर्थ्यांचा एकत्रित उपयोग करता येईल.

औद्योगिक महासत्ता म्हणून इटलीचे स्थान प्रतिबिंबित करण्याच्या हेतूने इटालियन डिझाईन, उत्पादकतेतील उत्कृष्टता आणि जागतिक दर्जाचे सुपर कॉम्प्युटर्स यांचा आणि भारताची वेगवान आर्थिक वृद्धी, अभियांत्रिकी नैपुण्य, व्याप्ती आणि १०० युनिकॉर्न आणि २ लाख स्टार्टअप्स असलेली नवोन्मेष आणि उद्योजक परिसंस्था, यांच्यात एक शक्तिशाली समन्वय साधण्याचे आमचे ध्येय आहे. हे केवळ एकत्रीकरण नसून मूल्यनिर्मितीची सह-प्रक्रिया आहे, ज्यामध्ये आपल्या परस्पर औद्योगिक सामर्थ्यांमुळे एकमेकांची क्षमता अधिक वृद्धिंगत होते.

युरोपियन युनियन आणि भारत यांच्यातील मुक्त व्यापार करार, वाढता व्यापार आणि गुंतवणूक या दोन्ही दिशांनी मार्ग खुला केला आहे . संरक्षण आणि अंतराळ, हरित तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, वाहन उद्योगातील घटक, रसायने, औषधनिर्माण, वस्त्रोद्योग, कृषी उत्पादने, पर्यटन आणि इतर क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून आम्हाला २०२९ पर्यंत भारत आणि इटली यांच्यातील व्यापार २० अब्ज युरोपर्यंत वाढवून त्याहीपेक्षा जास्त विस्तार करायचा आहे.

जगभरात 'मेड इन इटली'साठी प्रचलित असलेला समानार्थी शब्द म्हणजे उत्कृष्टता हा होय आणि त्याने आज 'मेक इन इंडिया' उपक्रमातील उच्च गुणवत्तेच्या उद्दिष्टांशी निसर्गतः समन्वय साधला आहे. या संदर्भात, इटालियन उद्योगांना भारतात उत्पादन करण्यात वाढलेले स्वारस्य आणि भारतीय उद्योगांची इटलीमधील वाढलेली संख्या, जी सध्या दोन्ही बाजूंनी एक हजारपेक्षा अधिक आहे, ही एक अत्यंत सकारात्मक गोष्ट असून त्यामुळे आपल्या पुरवठा साखळीतील समन्वय वृद्धिंगत होईल.

तांत्रिक नवोन्मेष आमच्या भागीदारीचा गाभा आहे. येणारी दशके अमर्याद व्याप्ती असलेल्या तांत्रिक क्रांतीने आकाराला येतील आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कम्प्युटिंग, प्रगत उत्पादकता, महत्त्वपूर्ण खनिजे आणि डिजिटल पायाभूत सुविधा अशा क्षेत्रांतील प्रगतीने ओळखली जातील. भारताची गतिशील नवोपक्रम परिसंस्था अतिशय कुशल व्यावसायिक प्रतिभासंपन्न मनुष्यबळाने युक्त असून इटलीच्या प्रगत औद्योगिक क्षमतांचा संगम झाल्याने वरील क्षेत्रातील आमचे सहकार्य अधिक नैसर्गिक आणि धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

या कार्यात आमची विद्यापीठे आणि संशोधन केंद्रांमधील वाढत्या भागीदारीचा मोठा पाठिंबा मिळेल. भारताची डिजिटल सार्वजनिक पायाभूत





सुविधा याआधीच विविध देशांमध्ये विशेषतः ग्लोबल साऊथमधील अनेक देशांमध्ये व्यापक प्रतिसाद मिळवत आहे.

विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव आपल्या समाजावर आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर आधीच दिसू लागला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास हा जबाबदार आणि मानवकेंद्रित असावा हे सुनिश्चित करण्यासाठी इटली आणि भारत दीर्घकाळापासून सहकार्य करत आहेत. या दृष्टिकोनातून पहिले तर भारत आणि इटली, कृत्रिम बुद्धिमत्तेकडे सर्वसमावेशक विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहत आहेत, विशेषतः ग्लोबल साऊथमध्ये जिथे डिजिटल पायाभूत सुविधा आणि सहज उपलब्ध बहुभाषिक तंत्रज्ञान दरी वाढवण्याऐवजी ती कमी करण्याचे कार्य करू शकते.

भारताच्या मानव - अर्थात मानवाला तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी ठेवण्याच्या ङ्ख दृष्टिकोनावर आणि मानवतावादी परंपरतेत रुजलेल्या 'मानवकेंद्रित अल्गोरिथमिक नीतिशास्त्राला प्रोत्साहन देणाऱ्या इटलीच्या नेतृत्वावर आधारित आमची भागीदारी कृत्रिम बुद्धिमत्तेला सामाजिक सक्षमीकरणासाठी एक प्रभावी प्रेरक शक्ती बनवण्याचा प्रयत्न करते. भारताच्या डिजिटल विस्ताराची इटलीच्या नैतिक आणि उद्योजकीय उत्कृष्टतेशी सांगड घालून तंत्रज्ञान मानवाच्या प्रतिष्ठेसाठी कार्य करेल हे सुनिश्चित करण्याचा आमचा दृष्टिकोन आहे. सुरक्षित डिजिटल सहकार्य, क्षमता-विकास आणि सक्षम सायबर पायाभूत सुविधांमधील सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण करून, प्रत्येक राष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासात सहभागी होता येईल आणि त्याचा लाभ घेता येईल असे खुले, विश्वासार्ह आणि न्याय्य डिजिटल क्षेत्र निर्माण करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. हा दृष्टिकोनच इटलीच्या जी-७ अध्यक्षपदाचा गाभा आणि नवी दिल्लीत झालेल्या एआय इम्पॅक्ट समिट २०२६ ची फलनिष्पत्ती आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेकडे मानवाने मानवासाठी विकसित केलेले साधन म्हणून पाहणे म्हणजे तंत्रज्ञान कधीही मानवाची जागा घेऊ शकत नाही किंवा त्यांच्या मूलभूत अधिकारांना बाधा पोहोचवू शकत नाही, तसेच सार्वजनिक चर्चेला प्रभावित करण्यासाठी किंवा लोकशाही प्रक्रियांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी त्याचा वापर होऊ नये, हे ठामपणे अधोरेखित करणे होय. अधिकाधिक परस्परसंलग्न होत चाललेल्या जगात स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याचा आमचा दृष्टिकोन याच मूलभूत आव्हानावर आधारित आहे.

आमच्या सहकार्यात अंतराळ क्षेत्राचाही समावेश आहे. भारताने अंतराळ संशोधन आणि उपग्रह तंत्रज्ञानात केलेली उल्लेखनीय प्रगती, तसेच इटलीची एरोस्पेस इंजिनीअरिंगमधील उत्कृष्टता, संयुक्त उपक्रम आणि पुढच्या पिढीतील तंत्रज्ञान विकासासाठी महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून देतात.

राष्ट्रांची समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी सुरक्षा आणि स्थैर्य आवश्यक आहे. संरक्षण, सुरक्षा आणि धोरणात्मक तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रांमध्ये आपले सहकार्य अधिक बळकट करण्याचा इटली आणि भारताचा मानस आहे. आमचे सहकार्य महत्त्वपूर्ण सागरी मार्गांची सुरक्षा सुनिश्चित करण्यास मदत करेल, तसेच दहशतवाद, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्क, अमली पदार्थांची तस्करी, सायबर गुन्हे आणि मानवी तस्करी यासारख्या धोक्यांचा सामना करण्यासाठी प्रतिरोधक क्षमता बळकट करेल.

ऊर्जा हा आमच्या भागीदारीचा आणखी एक महत्त्वाचा स्तंभ आहे. वैविध्यपूर्ण ऊर्जा स्रोतांकडे जागतिक स्तरावर होणाऱ्या संक्रमणासाठी नवोन्मेष, गुंतवणूक आणि सहकार्याची आवश्यकता आहे. भारत आणि इटली नूतनीकरणक्षम ऊर्जेपासून ते हायड्रोजन तंत्रज्ञानापर्यंत आणि स्मार्ट ग्रीड्सपासून ते लवचीक पायाभूत सुविधांपर्यंत सहकार्य करत आहेत.

हरित हायड्रोजन निर्यातीचे केंद्र बनण्याच्या भारताच्या प्रयत्नांमध्ये प्रचंड क्षमता आहे आणि ते अक्षय ऊर्जा पायाभूत सुविधांमधील इटलीच्या प्रगत तंत्रज्ञानाला तसेच युरोपसाठी ऊर्जा प्रवेशद्वार म्हणून असलेल्या तिच्या धोरणात्मक भूमिकेला उत्तम प्रकारे पूरक ठरते.

आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (आयएसए), आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांसाठी आघाडी (सीसीआरआय) आणि जागतिक जैवइंधन आघाडी (जीबीए) या भारताच्या नेतृत्वाखालील प्रमुख आघाड्यांमध्ये इतर देशांसोबतचे आमचे सहकार्यही या संदर्भात महत्त्वाचे आहे.

भौतिक, डिजिटल आणि मानवी जोडणी म्हणजे आपल्याला एकत्र विणणारा एक धागा आहे. भारत आणि इटली हे दोन्ही देश जागतिक अर्थव्यवस्थेच्या दोन महत्त्वपूर्ण केंद्रांच्या अगदी मध्यभागी वसलेले आहेत, म्हणजेच इंडो-पॅसिफिक आणि भूमध्य समुद्र (मेडिटेरेनियन)- हे असे प्रदेश आहेत ज्यांच्याकडे स्वतंत्र क्षेत्र म्हणून पाहिले जाऊ शकत नाही, तर त्याऐवजी ते वाढत्या प्रमाणात परस्परांशी जोडलेले अवकाश आहेत. वास्तविक, आपण ज्याला इंडो-मेडिटेरेनियन म्हणू शकतो त्याचा उदय आपण पाहत आहोत, जो व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा, डेटा आणि विचारांसाठी हिंदी महासागराला युरोपशी जोडणारा एक महत्त्वाचा कॉरिडॉर आहे. याच परस्परांशी जोडलेल्या अवकाशात आपले नाते नैसर्गिकरीत्या एका विशेष धोरणात्मक भागीदारीत विकसित होते- जे दोन खंडांना जोडते आणि नवीन जागतिक गतिमानतेला आकार देते.

या संदर्भात, इंडिया-मिडल इस्ट-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर (आयएमईसी) आधुनिक वाहतूक आणि पायाभूत सुविधा, डिजिटल नेटवर्क्स, ऊर्जा प्रणाली आणि लवचीक पुरवठा साखळी याद्वारे आपल्या प्रदेशांना जोडण्याच्या उद्देशाने असलेल्या एका दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करत आहे. हा दृष्टिकोन प्रत्यक्षात आणण्यासाठी भारत आणि इटली इतर भागीदारांसोबत एकत्र काम करण्यासाठी कटिबद्ध आहेत.

आपल्या राष्ट्रांमधील प्रगल्भ भागीदारी आणि शाश्वत सांस्कृतिक संबंधांचा आधार घेऊन आपण आपल्या सामायिक आव्हानांना तोंड देऊ शकतो. भारतीय संस्कृतीत 'धर्म' ही संकल्पना आपल्या कृतींना दिशा देणाऱ्या कर्तव्यभावनेचे प्रतीक आहे; तर 'वसुधैव कुटुंबकम्' - अर्थात संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे- हा सिद्धांत आजच्या परस्परांशी जोडलेल्या डिजिटल युगात अत्यंत प्रभावीपणे प्रतिध्वनित होतो.

अशा मूल्यांना इटलीच्या मानवतावादी परंपरेत एक नैसर्गिक प्रतिसाद मिळतो, ज्याची मुळे प्रबोधन युगातील आहेत, जी प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेवर आणि लोकांना व समाजाला एकत्र आणण्याच्या संस्कृतीच्या शक्तीवर भर देत आहेत. त्यामुळे, आमचा सामायिक दृष्टिकोन आपल्या लोकांना केंद्रस्थानी ठेवून एक मजबूत आणि भविष्यवादी भारत-इटली भागीदारीचा पाया घालण्याचा प्रयत्न करत आहे.

## वेध

**गिरीश शेरेकर**

# यंदाही फुटणार काँग्रेसची मते?

विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. तब्बल दोन वर्षे या निवडणुकीला विलंब झाला. कारण स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लांबल्या होत्या. या विधान परिषद निवडणुकीत जिल्हा परिषद, नगर परिषद, नगर पंचायत, महापालिकेचे सदस्य आणि पंचायत समितीचे सभापती मतदार असतात. पण, अमरावती जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका झालेल्या नाहीत. या दोन्ही संस्थांचे सदस्य यंदाच्या निवडणुकीत मतदार म्हणून राहणार नसल्याने मतदारसंख्या ७३ ने कमी झाली आहे. यंदा जवळपास ४२५ मतदार राहतील. या मतदारसंख्येचे पक्षनिहाय वर्गीकरण केल्यास महायुतीकडे उमेदवार जिंकून आणण्याइतकी संख्या आहे. महाविकास आघाडी व अन्य त्यापेक्षा थोडे कमी आहेत. मविआचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसने जोर लावला तर यंदाची निवडणूक रंगतदार होऊ शकते.

राजकीय पक्ष ही निवडणूक अतिशय वेगळ्या पद्धतीने लढतात. आजवरचा इतिहास बघितला तर क्रॉस व्होटिंग मोठ्या प्रमाणात झाल्याचे पाहायला मिळाले आहे. अमरावती मतदारसंघाचा विचार करायचा झाल्यास २०१२ पेक्षा २०१८ मध्ये मोठ्या प्रमाणात क्रॉस व्होटिंग झाले होते. त्याची चर्चा संपूर्ण राज्यात झाली होती. काँग्रेस व सहकारी पक्षाच्या २१० मतदारांनी तेव्हा भाजपा उमेदवाराला मतदान केले होते. हक्काची मतेसुद्धा काँग्रेस उमेदवाराला न मिळाल्याची चर्चा संपूर्ण राज्यात झाली. काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी एकमेकांकडे बोट दाखविले. काँग्रेसमधल्या तेव्हाच्या दुय्यम फळीतल्या कार्यकर्त्यांनी या निवडणुकीतले फारच रंजक किस्से सांगितले होते. निवडणूक निकालांवर नेहमीच आक्षेप घेण्याची सवय लागलेल्या काँग्रेसने या निकालावर मात्र अजिबात संशय व्यक्त केला नव्हता, हे विशेष! या दारुण पराभवाचे प्रकरण राहुल गांधी व अन्य नेत्यांकडे गेले होते. पण, त्यांनी देखील या गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष केले होते. राहुल यांनी तेव्हाच जाब विचारला असता तर काँग्रेसची इतकी वाताहत झाली नसती. राहुल गांधी कोणतीच गोष्ट गंभीरपणे घेत नाहीत. अमरावतीचा विषय त्यांनी बाजूला ठेवला असेल तर ती त्यांच्या नेतृत्वाची पद्धत मानली पाहिजे.

आता यंदा होऊ घातलेल्या निवडणुकीत काय स्थिती राहील, याची चर्चा सुरू आहे. काँग्रेसकडून अद्याप प्रमुख असे नाव समोर आलेले नाही. रवी राणा यांचा युवा स्वाभिमान महायुतीत आहे. यावेळी त्यांच्याकडे मते जास्त आहेत. गेल्या आठ वर्षांत लोकसभा व विधानसभा निवडणुका झाल्या. त्यात अनेक घडामोडी झाल्याने बरेच पाणी वाहून गेले. महायुतीतली राष्ट्रवादी व शिवसेना भाजप उमेदवाराच्या बाजूने राहील, असे दिसते. रवी राणा यांचे भाऊ सुनील राणा या निवडणुकीत उतरण्याची चर्चा जोर धरत आहे. तसे झाले तर महायुतीत जोरदार रस्सीखेच होईल. याचा फायदा काँग्रेस घेते की नाही, हे पाहावे लागेल. सध्याची स्थिती लक्षात घेतली तर काँग्रेसकडून फारशी हालचाल होताना दिसत नाही. महायुतीच्या उमेदवारावरून सुरू असलेल्या अंतर्गत कलहाचा फायदा घेणारा उमेदवार जर काँग्रेसने दिला तर या निवडणुकीचे चित्र बदलू शकते. सध्या तरी भाजपची बाजू मजबूत आहे. त्यांच्याकडे ही निवडणूक लढण्याचे कौशल्य आहे. यंदाही आपल्याला काँग्रेस व अन्य पक्षांची मते मिळतील, असा विश्वास भाजपला आहे. त्याच्या या विश्वासाला काँग्रेस बळ देते की तगडा उमेदवार उभा करून आपले अस्तित्व कायम ठेवते, याकडे सर्वांचे लक्ष राहणार आहे. काँग्रेसची मते यंदाही फुटणार, ही चर्चा किती खरी आणि खोटी हे माहीत नाही. निकालानंतरच काय ते कळेल. सध्या मात्र चर्चेच्या बाजारात गर्मी आहे. उमेदवार जिंकला नाही तरी चालेल, पण त्याला हक्काची मते मिळायलाच हवी, हा निर्धार जेव्हा काँग्रेस करेल तेव्हाच ही निवडणूक रंगेल. अन्यथा पुनरावृत्ती ठरलेली दिसते.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# सप्त भुवन आणि सप्त तल!

आपल्या प्राचीन ब्रह्मांड विज्ञानात १४ भुवने किंवा १४ लोक सांगितले आहेत. त्यामागची कथा विविध पुराणांत थोड्या थोड्या फरकाने आली आहे. त्यानुसार - ''एकाकी न रमे, म्हणोनी निर्मिली चौदाही भुवने''

भगवान आपोनारायणा म्हणजे सर्वत्र जलमय आणि तिथे भगवान नारायण वटपत्री बाळरूपात शयन करीत असताना त्यांना एकट्याला करमत नव्हते म्हणून त्यांनी चौदा भुवने निर्माण केल्याचे सांगितले जाते. त्यात पृथ्वीलोक भगवद्भक्तांसाठी महत्त्वाचा आहे. आपल्या पृथ्वीलोकाच्या वरील लोक त्याला ऊर्ध्व लोक म्हणतात. सहज लक्षात यावे म्हणून आपण त्याला सप्त भुवन म्हणतो.

पृथ्वीलोकाखाली असलेल्या लोकाला अधो लोक म्हणतात. त्याला आपण सप्त तल म्हणतो. दोन्ही मिळून चौदा भुवन म्हणण्याचा प्रघात आहे.

ऊर्ध्वलोक अर्थात सप्त भुवन म्हणजे भूलोक, भुवलोक, स्वलोक, महालोक, जनलोक, तपलोक आणि सत्यलोक अशी त्यांची नावे आहेत.

अधोलोक म्हणजे सप्ततल खालीलप्रमाणे आहेत. अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल, पाताल.

सप्त भुवन आणि सप्त तल हे ब्रह्मांड विज्ञान आहे. खगोल विज्ञान आणि ज्योतिष आहे. चौदा भुवनात ऊर्ध्वलोकाचा विचार करू.

**१) भूलोक** : या लोकाला पृथ्वीलोक, मर्त्यलोक, मृत्युलोक, मध्यलोक असेही म्हणतात. भूलोकात मानवी जीवन, प्राणी, पक्षी, वनस्पती, जीवसृष्टी अर्थात भौतिक जीवन आहे.

**२) भूर्लोक** : ऊर्ध्वलोकातील दुसऱ्या क्रमांकावर असलेले भुवलोक म्हणजे वायुमंडळ होय. हे लोक म्हणजे अंतरिक्ष वायुमंडलीय क्षेत्र याला ऊर्जा क्षेत्र असेही म्हणतात. सिद्धमुनी, योगी, अंतरिक्ष देवता इथे निवास करतात. इथे प्रकाश तत्त्व, ब्रह्मांड ऊर्जा असते. पृथ्वीपासून सूर्यापर्यंतचे आंतरिक चेतनेचे आवरण म्हणजे भूर्लोक होय.

**३) स्वर्लोक** : दैवीय ऊर्जा केंद्र असलेल्या या लोकाला स्वर्गलोक म्हणतात. इथे देवता, ऋषी आणि पुण्यात्म्यांना स्थान आहे. दिव्य, आनंदमयी असलेल्या या लोकांत इंद्र राजा तर वरुण, सोम, कपिल, अग्नी यांचे प्राबल्य आहे. या लोकात भौतिक कष्टातून मुक्ती आहे. भूलोकात केलेल्या सत्कर्माचे फळ स्वर्ग आहे.

**४) महर्लोक** : भूलोकापासून चौथे स्थान असलेला मह:लोक. याला अविनाशी लोक म्हणतात. इथे सप्तर्षी, भृगु ऋषी असे महान ऋषी निवास करतात. महार्लोकाचा ज्ञानप्रकाश सर्वत्र असतो. प्रलयाच्या वेळी हा लोक सुरक्षित असतो. उच्च चेतना आणि दिव्य ज्ञानाचे हे केंद्र आहे.

**५) जनलोक** : भूलोकापासून पाचव्या स्थानावरचे हे भुवन दिव्य आणि पवित्र आत्म्यांचे स्थान आहे. सनक, सनंदन, सनातन, सनतकुमार इथे राहतात. इथे असलेले पुण्यात्मे विरक्त असतात. त्यांना सांसारिक अथवा कोणत्याच इच्छा नसतात. विवेकपूर्ण जीवन आणि आदर्श चेतनेने व्याप्त असा जनलोक आहे. विशेष म्हणजे ज्ञान, कला, संगीत याचे निवासस्थान जनलोक आहे.

**६) तपोलोक** : भूलोकापासून ऊर्ध्वांगे सहाव्या स्थानावर असलेला तपोलोक तपस्वी लोकांचे स्थान आहे. कठोर साधकांचे स्थान असलेला हा लोक म्हणजे इथे मोह, माया, इच्छा नसलेले पुण्यात्मे राहतात. भूलोकावर असलेली बंधने या लोकात नाही. आध्यात्मिकतेची परमोच्च पातळी इथे गाठलेली असते त्यामुळे हे आत्मोन्नती केंद्र आहे. तपोलोकासाठी मोक्षाची कवाडे सतत उघडी असतात.

**७) सत्यलोक** : सर्वांत उच्च स्थानावर असलेल्या सत्यलोकाला ब्रह्मलोक असेही म्हणतात. ज्यांना जन्म-मरणाचा फेरा चुकला ते पुण्यात्मे इथे राहतात. हे परमेश्वराचे कायम निवासस्थान यालाच मोक्ष म्हणतात. परमशांतीचे ब्रह्मांडीय चेतना केंद्र आहे. हा लोक स्वयंप्रकाशित असून सूर्य-चंद्राचा प्रभाव इथे नाही. सदैव प्रफुल्ल असलेला हा लोक आहे.

भूलोकाच्या खाली असलेले अधोलोक ज्यामध्ये दनूचे पुत्र दानव, दैत्य, नाग राहतात. देवर्षी नारदांनी वर्णन करताना अधोलोक स्वर्गाहून सुंदर असून तिथे चंद्र, सूर्य नाहीत पण त्याहून तेजस्वी रत्न मणी आहेत. त्यामुळे ते लख्ख प्रकाशमयी आहेत. ते देखील सप्त तल म्हणून सर्वज्ञात आहेत.

**१) अतल** : भूलोकापासून सर्वांत प्रथम असलेला अधोलोक म्हणजे अतल. इथे मयासुराचा पुत्र बालासुराचे राज्य आहे. त्याच्याजवळ विविध शक्ती असल्याने येथील जीवन विलासपूर्ण असते. येथील असुरांना हत्तीचे बळ प्राप्त असते. इथे अध्यात्माला फार स्थान नाही.

**२) वितल** : भूलोकापासून दुसरा असलेला अधोलोक आहे. येथील जीवात्मे शिवाचे भक्त शिवगण, पिशाच्च आहेत. कारण इथे महादेव हटकेश्वर रूपात भवानीसह राहतात. इथे हटकी नावाची नदी आहे. भौतिक संपत्ती आणि सुवर्ण संग्राहक लोकांचा हा वितल आहे.

**३) सुतल** : भूलोकापासून तिसरा असलेला हा अधोलोक सर्वांगसुंदर आहे. इथे प्रल्हादाचा नातू आणि विरोचन पुत्र बळीराजाचे राज्य आहे. भगवान वामन इथे बळीराजावर कृपेचा वर्षाव करीत असतात.

**४) तलातल** : भूलोकापासून चौथा असलेला अधोलोक म्हणजे तलातल. रचनाकार मयासुर यांचे हे निवासस्थान. रावणाची पत्नी मंदोदरी ही मयासुराची मुलगी. तलातल रावणाची सासुरवाडी आहे.

**५) महातल** : भूलोकापासून पाचवा असलेला हा अधोलोक रत्नमण्यांची खाण आहे. इथे नागवंश राहतात. कश्यप ऋषी आणि माता कद्रू यांच्यापासून निर्माण झालेला हा वंश आहे. तक्षक, कालिया इथेच निवासी असतात.

**६) रसातल** : मृत्युलोकांपासून सहावा असलेला हा अधोलोक आहे. इथे दैत्यराज, दानवराज आणि निवातकवच आदी राक्षस निवांत राहतात. त्यांचे शत्रू देव स्वर्गात राहतात. स्वर्गापासून खूप अंतरावर रसातल आहे म्हणून राक्षस इथे शांत राहतात.

**७) पाताळ** : अधोलोकातील सर्वांत शेवटचा तल म्हणजे पाताळ. इथे सूर्य पोहचू शकत नाही म्हणून अंधार असतो पण इथले रत्न, मणी प्रचंड प्रकाशमान असल्यामुळे इथे सर्वत्र लख्ख प्रकाशमय वातावरण असते. इथे सर्पराज वासुकी यांचे राज्य आहे. शेषनागही इथेच विराजमान आहेत.

आपल्या विष्णू पुराण, शिव पुराण आणि भागवत पुराणात याबाबत वर्णन आहे. आपले भारतीय ब्रह्मांडविज्ञान किती प्रगत होते यावरून लक्षात येईल. नवीन पिढीने अभ्यास करून यातील गर्भितार्थ शोधून काढल्यास याबाबत अधिक ज्ञान जगासमोर येईल.

९८२२२६२७३५

## वाचक पत्र

### वाढते शहरीकरण आणि पर्यावरण...

आजच्या आधुनिक युगात शहरीकरण वेगाने वाढत आहे. उद्योगधंदे, रोजगार, शिक्षण आणि चांगल्या सुविधा मिळवण्यासाठी लोक मोठ्या प्रमाणात शहरांकडे स्थलांतर करत आहेत. त्यामुळे शहरांची संख्या आणि लोकसंख्या दोन्ही वाढत आहेत. परंतु या वाढत्या शहरीकरणाचा पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहे. पूर्वी लोक बहुतेक ग्रामीण भागात राहत होते. शेती आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवर त्यांचे जीवन अवलंबून होते. पण औद्योगिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शहरांचे महत्त्व वाढले. रस्ते, इमारती, कारखाने आणि वाहने यांची संख्या झपाट्याने वाढू लागली. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला.

वाढत्या शहरीकरणामुळे वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर होत आहे. नवीन इमारती आणि रस्ते बांधण्यासाठी झाडे तोडली जातात. त्यामुळे हवेतील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते आणि प्रदूषण वाढते. वाहनांच्या धुरामुळे वायुप्रदूषण वाढते. शहरांमध्ये लोकसंख्या वाढल्यामुळे कचऱ्याचे प्रमाण वाढते. योग्य व्यवस्थापन नसल्यास हा कचरा पर्यावरणासाठी धोकादायक ठरतो. तसेच जलस्रोत कमी होणे, तापमान वाढणे आणि जैवविविधतेचा नाश होणे यासारख्या समस्या निर्माण होतात. विकास करताना पर्यावरणाचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. वाढते शहरीकरण आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे ही आजची मोठी गरज आहे. अधिकाधिक वृक्षलागवड, प्रदूषण नियंत्रण, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारल्यास आपण निसर्गाचे रक्षण करू शकतो. विकासासोबत पर्यावरण संवर्धन हीच काळाची गरज आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## ग्राहक पंचायत महाराष्ट्र चे जूलै महिन्यात पुण्यात थेऊर येथे राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन

बीड / मुंबई : ग्राहक पंचायत महाराष्ट्र चे संस्थापक ग्राहकतीर्थ बिंदू माधव जोशी यांच्या बरोबर मला काम करण्याची व त्यांच्या बरोबर सहवासाची संधी मला मिळाली हे माझे मी भाग्य समजतो असे सांगतानाच जूलै महिन्यात थेऊर पुणे येथे राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे राज्य सचिव अरुण वाघमारे यांनी विक्रोळी कन्नमवार नगरात गुरुवारी,दि.१४ मे २०२६ रोजी दिली.संस्थेच्या मुंबई उपनगर कुर्ला तालुका येथील गेटवेल सून कार्यालयात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.त्याप्रसंगी अरुण वाघमारे बोलत होते.या बैठकीत राज्य सहसचिव सुरेश पाटील,एसजीआरएफ चे अध्यक्ष महेंद्र दिवाकर, मुंबई उपनगर कुर्ला तालुका अध्यक्ष संजय येवले, उपाध्यक्ष दिनेश बेरीशेट्टी, संघटक जयश्रीदिदी खिलारी, सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, खजिनदार प्रणिता वैराळ, माध्यम प्रतिनिधी सहिष्णुता कांबळे,सल्लागार मुकुंद कुलकर्णी यांच्या सह तालुका कार्यकारिणी उपस्थित होती.

ग्राहक संरक्षण कायदा कश्या पद्धतीने तयार झाला याची सविस्तर माहिती अरुण वाघमारे यांनी देऊन त्याची अंमलबजावणी २४ डिसेंबर १९८६ रोजी झाल्याचे सांगितले.ग्राहक संरक्षणात उत्पन्नात वाढ, वितरणात समानता व उपभोगावर संयम ही तीन आयाम आहेत असे अरुण वाघमारे यांनी स्पष्ट केले.अध्यात्म आणि सामाजसेवा यांची सांगड घालून संवाद आणि कार्य यात समन्वय असला पाहिजे असे त्यांनी अधोरेखित केले.आपल्या संस्थेच्या लेटरहेडचा योग्य वापर झाला पाहिजे याकडे त्यांनी लक्ष्य वेधले.राज्य सहसचिव सुरेश पाटील यांनी समितीमध्ये एकसंघ काम कसे असावे, कार्यकर्ता कसा असावा,कामाचे वाटप कसे करावे.

## जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी विक्रीसाठी उपलब्ध

बीड, दि. २० (जि. मा. का.):- जिल्हा माहिती कार्यालय, बीड येथील वर्तमान पत्रांची रद्दी आहे त्या स्थितीत व स्वरूपात रद्दीची विक्री करावयाची आहे. ज्यांना रद्दी घ्यावयाची आहे. त्यांना कार्यालयीन वेळेत रद्दी पाहवयास मिळेल. तसेच रद्दी खरेदी करण्यास इच्छुक असल्यास त्यांनी त्यांच्या लिफाफाबंद निविदा दरपत्रक प्रति किलोप्रमाणे जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालयाच्या बाजुला, नगर रोड, बीड या पत्यावर दि. २५ मे २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत. रद्दी प्रत्यक्ष पाहून बंद लिफाफ्यात आपले आवश्यकतेनुसार संस्थेच्या नोंदणीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

रद्दी विक्रीचे दरपत्रक मंजूर करणे अथवा रद्द करणे, रद्दी विक्रीबाबतचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, बीड यांचे असतील. २५ मे २०२६ तारखेनंतर प्राप्त झालेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

## शंकर बर्डे हत्या प्रकरणी आरोपींना तात्काळ अटक करा

### बेमुदत उपोषणाचा एकलव्य भिल्ल समाज संघटनेचा इशारा

बीड । वार्ताहर : शिरूर तालुक्यातील पाडळी येथील आदिवासी भिल्ल समाजातील शंकर बर्डे यांच्या हत्या प्रकरणात पोलिस प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळेच ही घटना घडल्याचा गंभीर आरोप एकलव्य भिल्ल समाज संघटनेने केला आहे. आरोपींना पुढील 2 दिवसांत अटक न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी बीड तसेच पोलीस अधीक्षक बीड यांना देण्यात आले आहे.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे वसतिगृह प्रवेश सुरू

बीड : अंबाजोगाई शहरात शिक्षण घेत असलेल्या इयत्ता आठवी पासून पुढील वर्गातील सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या अंबाजोगाई येथील आदिवासी मुलांच्या वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी www.swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जावून ऑनलाईन अर्ज करावेत. काही अडचण आल्यास गृहपाल, आदिवासी मुलांचे शासकिय वसतिगृह अंबाजोगाई यांच्याशी संपर्क करावा. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## तृतीयपंथीयांना बीज भांडवल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

बीड, दि. २० (जिमाका) :- तृतीयपंथीय बांधवांना समाजात मानाचे स्थान मिळण्यासोबतच त्यांना हक्काचा रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी शासनाने एक मोठे पाऊल उचलले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून तृतीयपंथीयांसाठी स्वयंरोजगार व व्यवसाय बीज भांडवल योजना लागू करण्यात आली आहे. तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त तृतीयपंथीयांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे.

बीज भांडवल योजनेतर्गत १८ ते ५० वयोगटातील तृतीयपंथीयांना २५ हजार रुपये ते २ लाखापर्यंतच्या व्यवसायासाठी अर्थसाह्य देण्यात येते. यामध्ये लघु कर्ज योजना, मध्यम कर्ज योजना व दीर्घ कर्ज योजना असे कर्जाचे एकूण तीन प्रकार आहेत. त्यासाठी अनुक्रमे २५ हजार रुपये, ५० हजार रुपये व २ लाख रुपये अशी आर्थिक मर्यादा विहीत करण्यात आली आहे. या योजनेतून भाजी स्टॉल, चहा/स्नॅक्स सेंटर, झेरॉक्स/लॅमिनेशन सेंटर, फ्रूट स्टॉल, पिठाची गिरणी, जनरल स्टोअर्स, स्टेशनरी शॉप, मिनी मालवाहतूक टेम्पो, पिठाची गिरणी, वडापाव/ज्यूस सेंटर, बेकरी व्यवसाय, बांगडी दुकान, सलून/ब्युटी पार्लर, मोबाईल शॉपी, मसाले तयार करणे, लॉन्ड्री/धोबी व्यवसाय, चिकन/मासे विक्री केंद्र, बटाटा वेफर्स बनविणे इत्यादी व्यवसायासाठी कर्ज देय आहे. या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या अर्थसहाय्यामध्ये लाभार्थी हिस्सा ५ टक्के, राष्ट्रीयकृत बँकेकडून विहित व्याजदराने ५० टक्के कर्ज व ४५ टक्के शासन अनुदानाचा समावेश आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी संबंधित तृतीयपंथीय व्यक्ती महाराष्ट्र राज्याचा किमान दहा वर्ष रहिवासी असणे आवश्यक आहे. संबंधिताकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

CHANGE OF NAME — सोलापूर तरुण भारत

CHANGE IN NAME

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

OLD NAME :- MALAN BEGAM HUSEN SHAH

CHANGE IN TO MY NEW NAME :- MALAN JIYAUDDIN INAMDAR

PRESENT ADD : ROZA MOHALLA KAIJ TQ KAIJ, DIST, BEED. 431123

MOB. NO - 9890161586

# बीड नगरपालिकेच्या हलगर्जीपणामुळे नागरिकाचा जीव धोक्यात

### सीसीटीव्ही पोलमध्ये उतरला करंट; परीट समाजाचे जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके गंभीर जखमी

**बीड |** प्रतिनिधी

बीड शहरातील अण्णाभाऊ साठे चौक परिसरात बीड नगरपालिकेच्या ढिसाळ व निष्काळजी कारभारामुळे मोठी दुर्घटना घडली. रस्त्याच्या डिव्हायडरजवळ उभारण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या पोलमध्ये विद्युत करंट उतरल्याने परीट समाजाचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके हे गंभीर जखमी झाले. सुदैवाने वेळीच उपचार मिळाल्याने मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १२ मे २०२६ रोजी रमेश घोडके हे त्यांच्या मुलाच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त कुटुंबासह अण्णाभाऊ साठे चौक येथील हॉटेल सागर येथे जेवणासाठी गेले होते. परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी असल्याने ते रोडच्या डिव्हायडरलगतून जात असताना तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या पोलला त्यांचा धक्का लागला. मात्र त्या पोलमध्ये विद्युत प्रवाह उतरलेला असल्याने त्यांना जोरदार करंट बसला आणि ते जागीच खाली कोसळले.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या वाहतूक पोलिसांनी तत्काळ धाव घेत रमेश घोडके यांना विवेकानंद हॉस्पिटलमध्ये दाखल केले. दोन दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांची प्रकृती स्थिर झाली असून ते आता धोक्याबाहेर असल्याची माहिती मिळाली आहे.

या घटनेमुळे बीड नगरपालिकेच्या गलथान कारभाराचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला आहे. नागरिकांच्या जीवाशी खेळ करणारे असे निष्काळजीपणाचे प्रकार अत्यंत संतापजनक असून सार्वजनिक ठिकाणी उभारण्यात आलेल्या पोल, विद्युत यंत्रणा आणि सीसीटीव्ही व्यवस्थेची तपासणी नेमकी कोण करणार? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

### बीड जिल्हा खरीप हंगामपूर्व आढावा बैठक संपन्न

## जिल्ह्यात कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करावी : जिल्हाधिकारी

बीड, दि.२० (जिमाका) :- जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बियाणे, खते व इतर कृषी निविष्ठा मुबलक आणि गुणवत्तापूर्ण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने चोख नियोजन करावे. तसेच जिल्ह्यात कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यावर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते.



यावेळी बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, प्र.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, कृषी उपसंचालक दादाराव जाधव यांच्यासह संबंधित विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या तसेच विशिष्ट कंपनीचे उत्पादन घेण्याची शेतकऱ्यांना सक्ती करणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई करावी. कृषी विभागाच्या भरारी पथकांनी वेळोवेळी कृषी केंद्रांना भेट देऊन तपासणी करावी, तसेच टोल फ्री क्रमांकावर प्राप्त तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. बोगस बियाणांची विक्री रोखण्यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या. कृषी केंद्र दुकानदारांनी बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांवर कोणतीही अट लादू नये, अन्यथा संबंधितांविरोधात कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. यावेळी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी बीड जिल्ह्यात गायरान जमिनीसह इतर ठिकाणी चारा लागवडीचे क्षेत्र वाढविण्यावर भर देण्यास सांगितले.

### खा.बजरंग सोनवणे यांच्या प्रयत्नांना मोठे यश

## गेवराई तालुक्यातील 'एमडीआर-20 ते यमगरवाडी' रस्ता कामाला मंजुरी!

### प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-४ अंतर्गत निधी मंजूर; ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण

बीड: गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांचा आणि दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यासाठी एक अत्यंत आनंदाची आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. तालुकयातील L021 एमडीआर-२० ते यमगरवाडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला अखेर 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-४' (PMGSY-IV) अंतर्गत प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. बीडचे खा. बजरंग सोनवणे यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक प्रयत्नांना यामुळे मोठे यश आले असून, या रस्त्यासाठी १ कोटी ३७ लक्ष २९ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने (नवी दिल्ली) १८ मे २०२६ रोजी या कामाला अधिकृत मंजुरी दिली असून, यामुळे परिसरातील ग्रामस्थांची अनेक वर्षांची मोठी अडचण दूर होणार आहे.

गेवराई तालुक्यातील एमडीआर-२० ते यमगरवाडी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात नेण्यासाठी, विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी आणि रुग्णांना रुग्णालयात नेण्यासाठी प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता. या रस्त्याचे खडीकरण आणि डांबरीकरण व्हावे, अशी आग्रही मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून केली जात होती.ग्रामस्थांची हीच गरज ओळखून खासदार बजरंग सोनवणे यांनी दिल्ली दरबारी आणि संबंधित मंत्रालयाकडे या रस्त्याच्या मंजुरीसाठी विशेष पाठपुरावा केला होता.

## यशस्वी व्हायचे असेल तर शॉर्टकट नव्हे, सातत्य व गुणवत्तेला प्राधान्य द्या - प्रा. विलास रोडे

### परळीत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि करिअर मार्गदर्शन सोहळा संपन्न

परळी (प्रतिनिधी): जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कोणताही शॉर्टकट न शोधता विद्यार्थ्यांनी नेहमी गुणवत्तेला प्राधान्य दिले पाहिजे. मेहनत, सातत्य आणि गुणवत्तेप्रती असलेली बांधिलकी यांमुळेच यश संपादन करता येते, असे प्रेरणादायी प्रतिपादन भीमजयंती महोत्सव समितीचे प्रा. विलास रोडे यांनी केले.

परळी भीमजयंती महोत्सव समिती आणि नालंदा फाउंडेशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. सोमवार सायंकाळी येथील लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, सम्राट अशोक विचार मंचाचे संयोजक प्रा. दासू वाघमारे तसेच प्रा. राम गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा. विलास रोडे म्हणाले की, आज व्यवसायाभिमुख शिक्षणासह विविध क्षेत्रांत अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी कोणतेही क्षेत्र निवडले तरी त्यात सर्वोत्तम कामगिरी करण्याचा निर्धार ठेवावा. शिक्षणामुळे खरा माणूस घडतो आणि जीवनाला योग्य दिशा मिळते. सध्या शिक्षण क्षेत्रात काही प्रमाणात बोगसगिरी वाढत असली तरी विद्यार्थ्यांनी त्यामुळे निराश न होता, आपली गुणवत्ता सिद्ध करून तिचा गौरव वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

## स्वा सावरकर प्राथमिक विद्यालय, बीड येथील विद्यार्थ्यांनी "इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत" उत्तुंग गगनभरारी

**बीड |** स्वा सावरकर प्राथमिक विद्यालय, बीड येथील विद्यार्थ्यांनी "इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत" उत्तुंग गगनभरारी घेत स्कॉलरशिपसाठी पात्र ठरले आहेत.सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्यवाह मा श्री डॉ हेमंतजी वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा प्राचार्य मा श्री चंद्रकांतजी मुळे, विद्यासभा उपाध्यक्ष मा श्री उमेशजी जगताप, स्थानिकचे अध्यक्ष मा श्री डॉ पी.के.कुलकर्णी,स्थानिक कार्यवाह डॉ. अविनाशजी देशपांडे शालेय समितीचे अध्यक्ष मा श्री सतिषजी कुलकर्णी, उपक्रमशील मुख्याध्यापिका श्रीमती बालिकाताई देशमुख मॅडम आणि सर्व शिक्षकांनी कौतुक केले आहे.



तरी पात्र विद्यार्थी यादी नुसार सर्वप्रथम कु. सृष्टी शरद भवर(242 गुण) द्वितीय क्रमांक चि.वेदांत मच्छिंद्र उपरे(224 गुण)तृतीय चि.अथर्व संतोष बेदरे (218) तर कु.वैष्णवी शांतीलाल गुरखुदे (210),चि.आदित्य नवनाथ सरडे (204),चि.आर्यन संदिप भोसले (192),कु. आरोही धनराज नेहरकर(152) यांचा समावेश आहे. आज विद्यालयात सर्व विद्यार्थी व पालक यांचे स्वागत व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा प्राचार्य मा श्री चंद्रकांतजी मुळे, विद्यासभा उपाध्यक्ष मा श्री उमेशजी जगताप, स्थानिकचे अध्यक्ष मा श्री डॉ पी.के.कुलकर्णी, शालेय समितीचे अध्यक्ष मा श्री सतिषजी कुलकर्णी, उपक्रमशील मुख्याध्यापिका श्रीमती बालिकाताई देशमुख मॅडम व शिक्षक उपस्थित होते.

*पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा प्राचार्य मा. श्री चंद्रकांतजी मुळे यांनी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक करून त्यांच्या मेहनतीचे आणि

## पुरुषोत्तमपुरीमध्ये गंगेत बुडून १३ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे अधिकमास यात्रेनिमित्त दर्शनासाठी भाविकांनी मांदियाळी असून मंगळवार दि.१९ रोजी सकाळी एक हृदयद्रावक घटना घडली. चिवडा व पेढे विक्री करणाऱ्या आकाश लक्ष्मण म्हेत्रे (बम १३, रा. पाटील गल्ली, माजलगाव) या अल्पवयीन मुलाचा गंगेत बुडून दुर्देवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. अधिकमासात दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी राहणार हे माहीत असताना प्रशासनाने नियोजन केले नाही त्यामुळे अशा दुर्दैवी घटना घडत आहेत अशी संतप्त भावना भाविक व्यक्त करत आहेत. याविषयी मिळालेल्या माहितीनुसार,माजलगाव शहरातील पाटील गल्लीत राहणारा आकाश म्हेत्रे हा कुटुंबासोचत अधिकमासात पुरुषोत्तमपुरी येथे यात्रे मध्ये चिवडा व पेढ़े विक्रीचे काम करत होता.मंगळवारी सकाळी तो गंगेत आंघोळ करण्यासाठी गेला असता पाण्याचा अंदाज न आल्याने बुडाला. काही वेळाने ही बाब नागरिकांच्या लक्षात आली.

प्रशासनाचे ढिसाळ नियोजन

मागील अधिक मासा दरम्यान पुरुषोत्तम पुरी येथे एका तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. तरीही कोणतीही उपायोजना न केल्याने यावर्षीही अधिकमासाच्या तिसऱ्याच दिवशी तेरा वर्षीय मुलाला प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे मृत्यू झालाआहे. तसेच यात्रेदरम्यान पहिल्याच दिवशी जवळपास 40 तोळे दागिने चोरीला गेले. त्यामुळे ढिसाळ नियोजनामुळे भाविकामध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे

## जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ

बीड, दि. २० (जिमाका) :- महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड मार्फत जिल्हा युवा पुरस्कारासाठी युवक कल्याण क्षेत्रात कार्य करणारे युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांच्या कार्याचे, योगदानाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे जिल्हा युवा पुरस्कार, जिल्ह्यातील १ युवक व १ युवतीस प्रत्येकी रोख रक्कम १० हजार रूपये, गौरवपत्र सन्मानचिन्ह पुरस्काराचे स्वरुप आहे. संस्थेसाठी संस्था ही सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १८६० किंवा मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार पंजीबध्द असाव्यात. संस्थेसाठी पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम ५० हजार रूपये गौरवपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. मागील एकुण सात वर्षाच्या पुरस्कारासाठी दि. १२ मे २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. मात्र पुरस्कार प्रस्ताव प्राप्त होण्याच्या अल्प प्रतिसादामुळे दि. २५ मे २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली आहे.

वर्ष २०१९-२० च्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी दि. १ एप्रिल २०१८ रोजी १३ वर्षे पुर्ण व ३१ मार्च २०२० रोजी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. सन २०२०-२१ च्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी दि. १ एप्रिल २०१९ रोजी १३ वर्षे पुर्ण व ३१ मार्च २०२१ रोजी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. सन २०२१-२२ च्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी दि. १ एप्रिल २०२० रोजी १३ वर्षे पुर्ण व ३१ मार्च २०२२ रोजी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. सन २०२२-२३ च्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी दि. १ एप्रिल २०२१ रोजी १३ वर्षे पुर्ण व ३१ मार्च २०२३ रोजी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे.

DNS Bank Ltd. Ambajogai
ISO 9001:2008 Certified Bank

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा. क्र./सरफेसी/०६/७००२-२०५/३२/२०२६-२७ दिनांक:- १९.०५.२०२६

नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे

प्रति,
१. श्री मुंजाजी रंगनाथ मुंडे (कर्जदार)
पत्ता:- मु. पो. वरवटी ता.अंबाजोगाई जि. बीड ४३१५१७
२. श्री गोविंद मुंजाजी मुंडे (सह-कर्जदार)
पत्ता:- मु. पो. वरवटी ता.अंबाजोगाई जि. बीड ४३१५१७
३. श्री संतोष मुंजाजी मुंडे
पत्ता :- मारुती मंदिरजवळ पत्ता:- मु. पो. वरवटी ता.अंबाजोगाई जि. बीड ४३१५१७
४. श्री राजकुमार रामभाऊ चाटे
पत्ता:- मु. पो. वरवटी ता.अंबाजोगाई जि. बीड ४३१५१७
५. श्री चांगदेव रंगनाथ मुंडे
पत्ता:- मु. पो. वरवटी ता.अंबाजोगाई जि. बीड ४३१५१७

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

**सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,

**विषय:-** नॉन-परफॉमिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- **परळी-रोड**

**सुचना:-** U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. तुमचे कर्जखाते दिनांक ०६.०५.२०२५ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
| --- | --- | --- |
| **खाते. क्र. ७००२-२०५ रु. 25,00,000/-** | मालमत्ता धारक मुंजाजी रंगनाथ मुंडे यांच्या मालकीची व्यावसायिक मालमत्ता मौजे गिरवली ता. अंबाजोगाई जि.बीड येथील गट. नं. २० क्षेत्र २ हे. २० आर रु. १.७६ पैसे असलेल्या जमिनीचे पूर्ण मालक असून ज्याच्या चतु:सिमा खालील प्रमाणे<br>पुर्व:- शरद किसान बावणे<br>पश्चिम :- रस्ता<br>दक्षिण:- महानंद मुंजाजी मुंडे<br>उत्तर :- चांगदेव रंगनाथ मुंडे<br>(" वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत ") | **मुद्दल + व्याज एकुण रु.१६,३७,२५४/-दिनांक ३०.०४.२०२६ रोजी + पुढील व्याज @ ११.८५ % दिनांक ०१.०५.२०२६ पासुन** |

- **वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा**
- **अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही**

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.

अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक **०५.०८.२०२२**
ब. गहाणखत नोंदणी दिनांक **०२.०८.२०२२ (गहाणखत नोंदणी क्र.४०९६ /२०२६ )**

५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. **मुद्दल + व्याज एकुण रु.१६,३७,२५४/-दिनांक ३०.०४.२०२६ रोजी + पुढील व्याज @ ११.८५ % दिनांक ०१.०५.२०२६ पासुन** आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक १९.०७.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला आमच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

**ठिकाण:- अंबाजोगाई**

(श्री. अनंत गोपाळराव देशपांडे)
अधिकृत अधिकारी (Secured Creditor)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई.
मो.७६६६५७७९००

सोलापूर तरुण भारत

www.daniktarunbharat.com, epaper.daniktarunbharat.com

# ऑनलाईन औषध विक्री विरोधात जिल्ह्यातील मेडीकल प्रतिष्ठाने बंद

## १२६० मेडिकल दुकानांचा सहभाग, प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मे**

अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना (अखजरू) यांच्या देशव्यापी आवाहनाला प्रतिसाद देत हिंगोली जिल्ह्यातील औषध विक्रेत्यांनी मंगळवारी एकदिवसीय बंद पाळला. जिल्ह्यातील तब्बल १२६० मेडिकल व औषध विक्रेत्यांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र निषेध व्यक्त केला.

हिंगोली जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात ऑनलाईन औषध विक्री, ई-फार्मसी तसेच औषध व्यवसायाशी संबंधित विविध समस्यांकडे शासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जिल्हाध्यक्ष राजेश रामेश्वर शिंदे व जिल्हा सचिव संतोष ताराचंद बहेती यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. हिंगोली शहरासह वसमत, कळमनुरी, सेनगाव आणि औंढा नागनाथ तालुक्यातील बहुतांश मेडिकल दुकाने दिवसभर बंद होती. त्यामुळे नागरिकांना काही प्रमाणात गैरसोयीला सामोरे जावे लागले.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, औषध विक्रेत्यांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, दरम्यान, अत्यावश्यक परिस्थिती लक्षात घेऊन काही ठिकाणी आपत्कालीन औषध सेवा सुरू ठेवण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले. या बंदमुळे जिल्हाभरातील औषध व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.यावेळी जिल्हा केमिस्ट अॅन्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर करण्यात आले आहे.



## जिल्हाधिकाऱ्यांकडून नागनाथ मंदिराची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मे**

औंढा येथील बारा ज्योतिर्लिंगापैकी आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ मंदिराची जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पाहणी केली. या मंदिरास विकासाकरिता तीर्थ विकास क्षेत्र अंतर्गत मोठा निधी उपलब्ध झाला असून मंदिर परिसरामध्ये विकास कामे होणार आहेत. नागनाथ मंदिर परिसरातील पश्चिम गेटवरील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ मोठ्या प्रमाणात अतिक्रमण फुटकळ दुकान व्यापाऱ्यांनी केले होते ते अतिक्रमण गेल्या आठवडाभरापासून काढण्यात येत आहे. त्याच भागाची जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पाहणी केली. तीर्थ विकास क्षेत्र अंतर्गत या ठिकाणी विकास निधी मधून विकास होणार आहे. तसेच त्यांच्यासोबत सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे येथील कर्मचारी होते.यांनी देखील मंदिर परिसरातील भक्त क्रमांक १,२,३ पाहणी करून माहिती जाणून घेतली. तसेच नागनाथ मंदिरावरील दगडी शिल्पकलाची माहिती देखील घेतली. यावेळी सा बां.विभाग पुणे तेजश्रीनी आपटे, तहसीलदार हरीश गाडे, अधीक्षक वैजनाथ पवार, सुरेंद्र डफळ आदींची उपस्थिती होती.

# हिंगोलीच्या मोंढ्यात भुईमूग शेंगांची विक्रमी आवक, भावात घसरण झाल्यामुळे शेतकरी चिंतेत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मे**

हिंगोली येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मागील दोन दिवसांपासून भुईमूग शेंगांची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. बाजारपेठेत दररोज ७ ते ८ हजार क्विंटल शेंगांची आवक होत असून, आवक वाढल्याने दरात मात्र काहीशी घसरण झाल्याचे पाहायला मिळत आहे. सध्या बाजारात भुईमूग शेंगांना प्रतिक्विंटल किमान ७ ते ८ हजार रुपये इतका दर मिळत आहे.

गेल्या काही दिवसांपासून तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांनी आपला भुईमूग काढणीवर भर दिला आहे. माल तयार होताच शेतकऱ्यांनी तो विक्रीसाठी हिंगोलीच्या मुख्य बाजारपेठेत आणण्यास सुरुवात केली आहे.

भुईमुगाची आवक अचानक प्रचंड वाढल्यामुळे बाजार समितीच्या आवारासह मोंढा परिसरातील सर्व भागांमध्ये रस्त्यांच्या दुतर्फा भुईमूग शेंगांचे मोठे ढीग पाहायला मिळत आहेत. संपूर्ण परिसर शेंगांच्या आवकेने फुलून गेला आहे.

मात्र, अपेक्षेपेक्षा कमी भाव मिळत असल्याने आणि मालाची एकाच वेळी कोंडी झाल्याने शेतकरी चिंतेत पडला आहे. बाजारात आलेल्या मालाची वेळेत विक्री व्हावी, यासाठी शेतकरी रणरणत्या उन्हात आपल्या शेंगांच्या ढिगावरच ताटकळत बसलेले चित्र सध्या सर्वत्र पाहायला मिळत आहे. आवक अशीच सुरू राहिल्यास दरावर आणखी काय परिणाम होतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.




हिंगोली– शिवसेना शिंदे गटाच्यावतीने लोकसभा मतदारसंघातील बीएलए ची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी संपर्कप्रमुख आनंदराव जाधव, आ. संतोष बांगर, गटनेते श्रीराम बांगर, युवा जिल्हाप्रमुख राम कदम, ज्येष्ठ कार्यकर्ते अशोक नाईक, नगरसेवक सुभाष बांगर, महिला जिल्हाप्रमख देवकते, उपनगराध्यक्ष माबुद बागवान यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच बीएलए यांची उपस्थिती होती. छाया–सुनील पाठक

## संक्षिप्त वृत्त

### आ. डॉ. प्रज्ञा सातव यांची राज्य तपासणी व सहनियंत्रण समितीच्या सदस्यपदी निवड



हिंगोली– महिलांचे आरोग्य, पीसीपीएनडीटी कायद्याची अंमलबजावणी आणि आरोग्य सेवांमधील पारदर्शकता तपासण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या राज्य तपासणी व सहनियंत्रण समितीच्या सदस्यपदी आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. प्रज्ञाताई सातव यांचा वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव आणि सामाजिक कार्याची दखल घेऊन राज्य सरकारने ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे.ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सुविधांच्या दर्जाची तपासणी करणे. गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याची कडक अंमलबजावणी सुनिश्चित करणे. सर्वसामान्य जनतेला मिळणाऱ्या आरोग्य सेवांमधील त्रुटी दूर करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हि समिती काम करणार आहे, या निवडीमुळे मराठवाड्यातील महिला आरोग्य आणि बाल लिंग गुणोत्तर सुधारण्याच्या कामाला बळ मिळणार असून.महाराष्ट्रात मुलींचे घटते प्रमाण ही गंभीर समस्या असून ती रोखण्यासाठी ही समिती केंद्रांची अचानक तपासणी करून कारवाई करण्याचे आधिकार या समितीला आहे.

### पतंजलीच्यावतीने योग दिनाची तयारी

हिंगोली– पतंजली योग परिवार नांदेड तर्फे १२ व्या जागतिक योग दिनाची तयारीसाठी हनुमान मंदिर ठिकाणी कार्यकर्ता बैठक घेण्यात आली. पतंजलीच्या प्रत्येक योगशिक्षक विद्यालय, महाविद्यालय, निवासी वस्तीगृह, खाजगी तसेच सरकारी ऑफिस, बँक आदी ठिकाणी एक, तीन, पाच तसेच सात दिवसीय निशुल्क योग शिबिराचे आयोजन करणार आहे. तसेच प्रत्येक तहसील स्तरावरती जागतिक योग दिनानिमित्त निशुल्क योग शिबिरे लावणार आहे. अशा पद्धतीने जागतिक योग दिनाची संकल्पना राबवण्यासाठी ५०१ ठिकाणी जिल्हास्तरावर योग शिबिरे लावण्यात येणार आहेत. या नियोजनासाठी पंढरीनाथ कंठेवाड, राम शिवपनोर, नागनाथ पाटील बिलोलीकर, महारुद्र माळगे, सुरेश लंगडापुरे, अनिल कदम, हरिहर नरवाडे, सदाशिव बुटले पाटील, शैलेंद्र नावडे, भरत टेकाळे, जनार्दन आठवले, व्यंकट कोटगिरे, हनुमंत ढगे, दिलीप आघाव, बालाजी कहाळेकर, राजू शेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते असे अनिल अमृतवार यांनी सांगितले.

### हिंगोलीत पारा ४२ अंशाच्यावर

हिंगोली– मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात शहरातील तापमान ४२ अंशाच्यावर पोहोचले असून उन्हाच्या कडाक्यामुळे दुपारी सर्वत्र शुकशुकाट दिसत आहे.

# खताचा अवैध साठा, डिझेल-पेट्रोलचा काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाई करा




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मे**

खताचा अवैध साठा करणाऱ्या तसेच डिझेल-पेट्रोलचा काळा बाजार करणाऱ्या आणि नीट परीक्षेचा पेपर लिक करणाऱ्यावर बुलडोजर कारवाई करण्याची मागणी उबाठा शिवसेनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राज्यपालांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

बुधवारी उबाठा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्यपालांना निवेदन सादर केले. ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर खत निर्मात्यांनी कृत्रिम भाववाढ केली आहे. काही व्यापाऱ्यांनी खताचा काळा बाजार करण्यासाठी खताचा अवैधसाठा केला आहे. तसेच पेट्रोल पंप चालक डिझेल-पेट्रोलचा काळा बाजार करून कृत्रिम तुटवडा निर्माण करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. राज्यातील लाखो विद्यार्थ्यांनी अहोरात्र मेहनत करून नीटची तयारी केली परंतु नीट पेपर लिक झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उध्वस्त झाले आहे. या विरोधात सरकारने कठोर पाऊल उचलून संबंधितांना शिक्षा करावी तसेच त्यांच्या घरावर, दुकानांवर बुलडोजर कारवाई करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर प्रदेश संघटक वसीम देशमुख, जिल्हा प्रमुख संदेश देशमुख, उध्दवराव गायकवाड, जिल्हा प्रमुख गोपू पाटील, भानुदास जाधव, उपजिल्हा प्रमुख परमेश्वर मांडगे, गणेश शिंदे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# एनटीसी भागातील महावितरणच्या रोहीत्राला आग, अनर्थ टळला



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मे**

शहररतील एन.टी.सी भागातील भगवान महावीर गार्डन येथे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. दिवस असो वा रात्र, तासनतास वीज गुल होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. या गंभीर समस्येकडे महावितरण कंपनीचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संतप्त नागरिकांमधून केला जात आहे. दिनांक १९ मे च्या मध्यरात्री महावीर गार्डन येथील रोहीत्राने अचानक पेट घेतला तेव्हा परीसरातील शुभम मुंदडा, रामदास बकरे, अमोल कान्हेड, नाना बांगर, डॉ. नितिन कुटे, प्रसाद ढोके, श्रीकांत कान्हेड, आकाश कटारीया यांनी तत्परता दाखवत आग विझविण्याचा प्रयत्न केला परंतु आग आटोक्यात येत नसल्याने कंट्रोल रुमला फोन करुन माहिति दिली व महावितरण कर्मचारी दत्ता अंभोरे यांनी व नागरीकांनी अथक परीश्रमाने आग विझवली. वीज बिल भरूनही नागरिकांना या नरकयातना सहन कराव्या लागत आहेत. महावितरणने आपला कारभार सुधारावा आणि तात्काळ अखंडित वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे. तसेच परीसरात विजेचा भार अधिक असल्याने जास्त क्षमतेची डी.पी टाकण्यात यावी अशी मागनी नागरीक करत आहेत. अन्यथा अंदोलनाच इशारा नागरीकांनी दिला आहे. अनेकदा तक्रार करुनही डि.पी बदलुन द्यावी अशी मागनी करुन देखील नेहमीच तात्पुरती डागडुजी करुन चालढकलपण महावितरणचे अधिकारी करतात असे येथील नागरीकांचे म्हणणे आहे.

# चिखली शिवारात दुचाकीस्वाराकडून गावठी पिस्टलसह जीवंत काडतूस जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मे**

वसमत तालुक्यातील चिखली शिवारात दुचाकीस्वाराच्या तपासणीमध्ये एक गावठी पिस्टल व दोन जीवंत काडतूस सापडले असून या प्रकरणी हट्टा पोलिस ठाण्यात दि १९ मे रोजी रात्री गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी एकास ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार परभणी जिल्ह्यातील मानवत येथील सुरजितसिंह टाक वय २६ हा नांदेड येथून दुचाकी वाहनावर परभणीकडे जात असून त्याच्या कपड्याच्या पिशवीमध्ये गावठी पिस्टल व जीवंत काडतूस असल्याची माहीती हट्टा पोलिसांना मिळाली होती. त्यावरून सपोनि संग्राम जाधव, उपनि शेख, माणिक सुर्यवंशी, संदीप सुरूशे, गणेश सुर्यवंशी, कृष्णा चव्हाण, हिरामण चव्हाण यांचय पथकाने मंगळवारी सायंकाळी चिखली शिवारात वाहनांची तपासणी सुरू केली. यावेळी सायंकाळच्या सुमारास पोलिसांनी एक दुचाकी वाहन थांबविले. यावेळी दुचाकीस्वार सुरजितसिंग याची चौकशी केली असता त्याने सुरूवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या जवळील पिशवीची तपासणी केली असता त्यात कपड्याच्या खालच्या बाजूस एक गावठी पिस्टल व दोन जीवंत काडतूस व दुचाकी वाहन असा सुमारे ७० हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी सपोनि संग्राम जाधव यांच्या तक्रारीवरून हट्टा पोलिस ठाण्यात सुरजितसिंग टाक याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास उपनि शेख करीत आहेत. सदरील पिस्टल व काडतूस कोठून खरेदी केले याचा तपास पोलिस घेत आहेत.

# अखिल भारतीय शैक्षणिक महासंघाची सहविचार सभा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मे**

अखिल भारतीय शैक्षणिक महासंघ संलग्न महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग) जिल्हा शाखा हिंगोलीच्या वतीने संघटनेचे मराठवाडा कार्याध्यक्ष नीलकंठ गायकवाड यांच्या निवासस्थानी म. रा. शिक्षक परिषदेचे प्रांत कार्यवाह पुरुषोत्तम काळे यांच्या अध्यक्षतेखाली सहविचार सभा संपन्न झाली या सभेत राष्ट्रप्रथम ठेवून विद्यार्थ्यांना दैवत मानून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी संघटना मंत्रालयीन स्तरावर प्रयत्नशील आहे शिक्षकांची प्रश्न, संघटनेची बांधणी, आगामी दिशा, नियोजन याविषयी त्यांनी शिक्षकांशी चर्चा केली व मार्गदर्शन केले. याप्रसंगी हिंगोली जिल्ह्यात येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी उपक्रम राबविण्यात येतील असे प्रांत कार्याध्यक्ष रमेश क्षीरसागर यांनी प्रतिपादन केले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष जगन्नाथ सोनटक्के, मराठवाडा उपाध्यक्ष कुंडलिकराव निर्मले, मराठवाडा सहकार्यवाह ज्ञानोबा पवार, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत घ्यार, विनायक धडवई, सेनगाव तालुका अध्यक्ष विजय वाबळे, जिल्हा कार्यवाह रामराव यशवंते तसेच मनोज वीर, दयानंद काळे बालाजी केंद्रे साईनाथ पाटील गोपीचंद देशमुख व अनेक पदाधिकारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलकंठ गायकवाड यांनी केले तसेच आभार प्रदर्शन विनायक धडवई यांनी केले.

# आरसीसी कोचिंग क्लासेसवर शिवसैनिकांचा हल्लाबोल



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० मे -**

नीट पेपर फुटी प्रकरणात दोषी असलेल्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करत युवासेना उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी आज शहरातील आरसीसी कोचिंग क्लासेसवर हल्लाबोल चढविला. यावेळी कोचिंग क्लासेसवर शाईफेक करुन शिवराज मोटेगावकर यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी लावून धरली.

नीट परिक्षेचा पेपर फुटल्यामुळे देशभरातील २२ लाख विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. नीट परिक्षेचा पेपर दहा लाख रुपयात विकत घेण्यात आला. महाराष्ट्रात आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर, प्रा.कुलकर्णी, मनिषा मांढरे, मनिषा वाघमारे यांच्यासह अनेकांचा समावेश आहे. या लोकांच्या चुकीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा खेळखंडोबा झाला असून, या प्रकरणातील दोषीवर कठोर कारवाई करावी, तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान व राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करत युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी शहरातील आरसीसी कोचिंग क्लासेसवर हल्लाबोल चढवत शाईफेक केली. यावेळी गणेश पेन्सलवार, सौरभ देवकत्ते, अशोक पावडे, नवज्योतसिंघ गाडीवाले, रवी नागरगोजे, बालाजी धुमाळ, गजानन हरकरे, विकास गच्चे, विकास सूर्यवंशी, प्रसाद देवणे आदी शिवसैनिकांची उपस्थिती होती.




नांदेड -लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात विद्यार्थी कृती समितीच्या वतीने दि.२० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात विद्यार्थी कृती समितीच्या वतीने दि.२० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

## रत्नाकर पांडे यांचे निधन

**नांदेड-** तामसा येथील ज्येष्ठ नागरिक रत्नाकर बळवंतराव पांडे (वय ७७) यांचे दीर्घ आजारामुळे दि.१८ मे रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर तामसा येथील स्मशानभूमीत दि.१९ रोजी सकाळी तामसा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# वादळात काळाचा घाला : इस्लापूर परिसरात विजेचा सिमेंट खांब कोसळून मजुराचा दुर्दैवी मृत्यू

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २० मे -**

येथील रेल्वे स्टेशनलगत असलेल्या शेतामध्ये विजेच्या तारांवर आलेल्या झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम सुरू असताना भीषण दुर्घटना घडली. या दुर्घटनेत एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

सदरील घटना दिनांक १९ मे रोजी सायंकाळी साधारणतः साडेचार ते पाच वाजण्याच्या दरम्यान घडली असून, अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे काही क्षणांतच आनंदाचे वातावरण शोककळेत बदलले.

मिळालेल्या माहितीनुसार, पोचीराम रुकमाजी सुकळेकर (वय ५५, रा. वाळकी खुर्द) हे प्रायव्हेट स्वरूपात लाईनवरील झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम करत होते. रेल्वे स्टेशन परिसरातील शेतात काम सुरू असताना अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे परिस्थिती गंभीर बनली. काम करत असतानाच पोचीराम सुकळेकर हे खांबावरून खाली कोसळले. त्याचवेळी सिमेंटचा विजेचा खांब जमिनीपासून दोन ते तीन फुटांच्या अंतरावरून तुटून थेट त्यांच्या पायावर कोसळला.

या भीषण दुर्घटनेत त्यांचा पाय अक्षरशः चिरडला गेला. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. गंभीर जखमी अवस्थेत पडलेल्या पोचीराम यांना वाचवण्यासाठी नागरिकांनी धावपळ सुरू केली. घटनेची माहिती मिळताच महावितरणचे कर्मचारी वाघमारे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. त्यानंतर म्बुलन्सच्या मदतीने पोचीराम सुकळेकर यांना प्राथमिक आरोग्य केंद्र, इस्लापूर येथे दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

या घटनेमुळे इस्लापूर परिसरात शोककळा पसरली असून, कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या



मजुरांकडे आवश्यक सुरक्षा साधने होती का? काम सुरू करण्यापूर्वी खबरदारी घेण्यात आली होती का? अशा प्रश्नांची चर्चा आता परिसरात सुरू झाली आहे.

विशेष म्हणजे, मृत पोचीराम सुकळेकर हे अत्यंत गरीब कुटुंबातील होते. कुटुंबाचा उदरनिर्वाह पूर्णपणे त्यांच्या कमाईवर चालत होता. रोजंदारीवर काम करून संसाराचा गाडा ओढणाऱ्या या कुटुंबाचा आधारस्तंभच या दुर्घटनेत हरपल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घरातील सदस्यांचा आक्रोश पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले.

दरम्यान, या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित कुटुंबाला न्याय द्यावा, मृताच्या कुटुंबाला शासन व प्रशासनाकडून तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी, तसेच नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ व नागरिकांकडून जोर धरत आहे.

ही घटना केवळ एक अपघात नसून, कामगारांच्या सुरक्षेकडे होत असलेल्या दुर्लक्षाचे गंभीर वास्तव अधोरेखित करणारी असल्याची भावना परिसरातून व्यक्त केली जात आहे.

## नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ काँग्रेस पक्षाच्या वतीने निवेदन



**मुदखेड** -देशातील वैद्यकीय शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ मुदखेड शहर काँग्रेस कमिटी व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आज दि.२० मे रोजी तालुक्याचे कर्तव्यदक्ष तहसीलदार डॉ.आनंद देवळगावकर यांना निवेदन देण्यात आले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, परीक्षा ही लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असून अलीकडे उघडकीस आलेल्या पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरातील विद्यार्थी, पालक व शिक्षण क्षेत्रात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. प्रामाणिकपणे व मेहनतीने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या या प्रकारामुळे परीक्षेच्या पारदर्शकता व विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत संबंधित दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक करण्यात यावी, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी सक्षम सुरक्षा व्यवस्था व आधुनिक तांत्रिक यंत्रणा उभारण्यात यावी आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक तणावाचा विचार करून केंद्र शासनाने योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली. या निवेदनाद्वारे शासनाने विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली. यावेळी जिल्हा काँग्रेस सहसचिव गिरीश अप्पा कोत्तावार,शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण,माजी नगरसेवक गंगाधर डांगे, विश्वनाथ पाटील पवार, रमेश बोडके, विठ्ठल आचार्य, वेदांत शेवटे, सुरेश पाटील ढगे, अनिस भाई, माणिका पाटील मुंगल, गोपाळ पाटील पवार,गोविंद गोपणपल्ले, यासह आदींची उपस्थिती होती.

# अर्ज गहाळ की घोटाळा ; केमिस्ट संघटनेच्या निवडणुक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० मे -**

नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेच्या त्रैवार्षिक निवडणुकीत भोकर येथील उच्चशिक्षित व रिटेल केमिस्टच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे कार्यकर्ते राजेश्वर लोकाबाड (रेड्डी) यांना अन्यायपूर्वक निवडणूक प्रक्रियेतून बेदखल करण्यात आल्याचा गंभीर आरोप आता समोर येत आहे. या प्रकारामुळे जिल्ह्यातील ग्रामीण रिटेल केमिस्टमध्ये तीव्र नाराजी व हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजेश्वर लोकावाड यांनी जिल्हाध्यक्ष पदासाठी नियमानुसार उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्याचबरोबर भोकर तालुका कार्यकारिणी सदस्य पदासाठीही त्यांनी नामनिर्देशन अर्ज भरला होता. मात्र एउ पदाचा अर्ज

मागे घेण्यासाठी त्यांनी अंतिम दिवशी निवडणूक अधिकाऱ्यांकडे रीतसर अर्ज जमा केला होता. संबंधित अर्ज स्वीकारल्याचे सीसीटीव्ही फुटेजही उपलब्ध असल्याचे सांगितले जात आहे. परंतु, धक्कादायक बाब म्हणजे एउ पदाचा अर्ज कार्यालयातूनच गहाळ झाल्याचे समोर आले. त्यामुळे एक उमेदवार एकाच पदासाठी निवडणूक लढवू शकतो या नियमाचा आधार घेत राजेश्वर लोकावाड यांचा अध्यक्षपदाचा अर्ज फेटाळण्यात आला. यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील अनेक रिटेल केमिस्टांनी या घटनेला पूर्वनियोजित षडयंत्र असल्याचा आरोप केला आहे. ज्या कार्यकर्त्यनि रिटेल केमिस्टच्या न्यायासाठी सातत्याने संघर्ष केला, त्यालाच कागदी नियमांचे कारण पुढे करून निवडणुकीबाहेर करण्याचा प्रयत्न झाला, अशी भावना अनेक केमिस्ट व्यक्त करत आहेत. सक्रिय व प्रामाणिक कार्यकर्त्याची उमेदवारीच रद्द झाल्याने आता संघटनेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. EC पदाचा अर्ज नेमका गहाळ कसा झाला? तो गहाळ करण्यामागे कोण आहे? निवडणूक प्रक्रियेत निष्पक्षता होती का? असे अनेक सवाल आता उपस्थित केले जात आहेत. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, तसेच राजेश्वर लोकावाड यांना न्याय द्यावा, अशी मागणी ग्रामीण भागातील रिटेल केमिस्टकडून होत आहे.

दरम्यान, या घटनेमुळे नांदेड जिल्हा केमिस्ट संघटनेतील अंतर्गत राजकारण पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले असून, ही संघटना खरोखर रिटेल केमिस्टसाठी आहे की काही मोजक्या प्रभावशाली गटांसाठी? असा सवालही आता उघडपणे विचारला जात आहे.

## विलास गजभारे यांना राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर

**नांदेड** -अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने दिल्या जाणारा यावर्षीचा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार २०२६ साठी सिडकोचे सामाजिक कार्यकर्ते विलास दादा गजभारे यांना जाहीर झाला आहे. फुले- शाहू -आंबेडकर चळवळीतील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैचारिक, कलात्मक अशा विविध पैलूंनी निः स्वार्थीपणे कार्य असलेल्या सप्त गुणांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सने यंदाचा २०२६ चा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी सामाजिक कार्यकर्ते विलास दादा गजभारे यांची निवड झाल्याचे पत्र संबंधित संस्थेच्या निवड समितीचे पत्र निवड समितीचे प्रमुख ड.सुजाता पोहरे नांदेड, डी. एस. वाघमारे अहमदपूर, बा.रा. वाघमारे नांदेड यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचित्र व सन्मानपत्र असे असून या पुरस्काराचे वितरण शुक्रवार दिनांक २६ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता नवीन नांदेड सिडको येथे संपन्न होणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नातेवाईक, मित्र मंडळ प्रदीप हानवते, सम्राट आढाव, आकाश सोनकांबळे यांच्यासह अनेकांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.



## किनवट तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीवर महसूल विभागाची धडक कारवाई

**किनवट** -तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल विभागाने धडक कारवाई करत विनापरवाना रेती वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर रेतीसह जप्त केला. ही कारवाई मंगळवारी (दि. २० मे) सकाळी सुमारे १०.३० वाजता मौजे बोधडी खुर्द येथे करण्यात आली. सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीतचंद्र दोंन्तुला तथा तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या पथकाने ही कारवाई केली. बोधडी खुर्द परिसरात अवैधरित्या रेती वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कारवाईदरम्यान रेतीने भरलेला ट्रॅक्टर पकडून जप्त करण्यात आला. संबंधित ट्रॅक्टर दुपारी सुमारे १२.३० वाजता तहसील कार्यालय, किनवट येथे जमा करण्यात आला. या कारवाईत मंडळ अधिकारी जयराम गाडे, ग्राम महसूल अधिकारी निकिता फोले, हरीश यादव, अनुसया ईप्पलवाड आणि संदीप मडावी यांनी सहभाग घेतला. अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा महसूल विभागाने दिला आहे. तसेच, अशा प्रकारांची माहिती नागरिकांनी तत्काळ प्रशासनाला द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.



# सरसम-कोठारी रस्त्याच्या गुत्तेदाराला ब्लॅकलिस्ट करा; गडकरींचे आदेश

## रस्त्याच्या दुरवस्थेची दिल्लीत दखल

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २० मे -**

किनवट - धनोरा ते भोकर राष्ट्रीय महामार्गावरील निकृष्ट दर्जाच्या कामाची केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गंभीर दखल घेतली असून, तसेच सरसम ते कोठारी दरम्यानच्या रस्त्याचे नव्याने टेंडर काढून दर्जेदार काम करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. तसेच संबंधित गुत्तेदारावर कठोर कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

नवी दिल्ली येथे आमदार भीमराव केरम यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांची भेट घेत धनोरा-भोकर राष्ट्रीय महामार्गाच्या दुरवस्थेबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी सरसम ते कोठारी दरम्यानच्या रस्त्यावरील मोठमोठे खड्डे, भेगा तसेच निकृष्ट दर्जाच्या कामाचे फोटो व व्हिडिओ त्यांनी गडकरी यांना दाखविले. या मार्गावर वारंवार होत असलेल्या अपघातांची माहिती देत नागरिकांच्या जीवितास निर्माण झालेला धोका देखील त्यांनी निदर्शनास आणून दिला.



रस्त्याची अवस्था पाहून संतप्त झालेल्या गडकरी यांनी तत्काळ महाराष्ट्र राष्ट्रीय महामार्ग विभागाचे मुख्य अभियंता तथा नॅशनल हायवे प्राधिकरणाचे अध्यक्ष अभियंता संतोष शेलार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. संबंधित गुत्तेदाराला तातडीने ब्लॅकलिस्ट करण्यासह त्याच्यावर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. तसेच सरसम ते कोठारी या रस्त्याचे नव्याने टेंडर काढून काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. धनोरा-भोकर मार्ग हा विदर्भ आणि मराठवाड्याला जोडणारा महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग असून, गेल्या काही महिन्यांपासून या मार्गावरील निकृष्ट दर्जाच्या कामामुळे वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ठिकठिकाणी पडलेले खड्डे, उखडलेला डांबरीकरणाचा थर आणि रस्त्यावर पडलेल्या भेगांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात होता. दरम्यान, या रस्त्याच्या दर्जेदार दुरुस्तीसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात तसेच नागरिकांना सुरक्षित आणि चांगला रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार केराम यांनी यावेळी केली. ना. गडकरी यांनीही या प्रकरणात कठोर भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## राज्यातील खाजगी कोचिंग क्लास बंद करण्याचा निर्णय घ्यावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० मे -**

नीट परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात खाजगी कोचिंग क्लास चालकाचा असलेला थेट संबंध यातून देशभरात आपल्या राज्याची बदनामी तर होत आहेच शिवाय प्रामाणिक व हुशार विद्यार्थ्यांवर अन्याय झालेला आहे. खाजगी क्लासेस चालकांच्या स्पर्धेत शिक्षणाचा बाजार होऊन बसला आहे. त्यामुळे राज्य सरकारने सरसकट कोचिंग क्लासेस बंद करण्याचा शासन निर्णय घ्यावा व तसेच भपकेबाज क्लास चालकांची सखोल चौकशी करावी अशी मागणी अन्याय प्रतिकार दलाचे संस्थापक कार्याध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ तलवारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

क्लासेसचा झगमगाट, टोलेजंग इमारती, भुरळ पाडणाऱ्या जाहिराती पाहून अकरावी व बारावी इयत्तेचे हजारो विद्यार्थी बळी पडत आहेत. क्लासेसला होणारी गर्दी अचंबित करणारी आहे. या उलट शासन मान्य अनुदानित, विना अनुदानीत महाविद्यालयात विद्यार्थ्यांची उपस्थिती रोडावली आहे किंबहुना ती नगण्य झाली आहे.

# प्रियदर्शिनीच्या वाढदिवसाने जपली सामाजिक बांधिलकी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २० मे -**

मौजे दौलापूर येथे शनिवार, दि. १६ मे २०२६ रोजी हनुमान मंदिर परिसरात कु. प्रियदर्शिनी (साऊ) हिच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला प्रबोधनात्मक कीर्तन, गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

वाढदिवसाचे औचित्य साधत समाजप्रबोधन, शिक्षणाचा गौरव आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरला. केवळ वाढदिवस साजरा न करता सामाजिक बांधिलकी जपत समाजहिताचा संदेश देण्याचा प्रयत्न आयोजकांकडून करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कु. प्रियदर्शिनी (साऊ) हिच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. उपस्थित मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी साऊला शुभाशीर्वाद देत




कुटुंबावर शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यानंतर गावातील व परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. माननीय आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांनी पत्राद्वारे कु. प्रियदर्शिनी हिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. काही कारणास्तव आमदार साहेब उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील शिंपाळकर यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व अभिनंदनपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान होत असल्याने पालक व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण ठरलेल्या प्रबोधनात्मक कीर्तनातून संत-महापुरुषांचे विचार, शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक एकता, संस्कार आणि पर्यावरण संवर्धन यावर प्रभावी मार्गदर्शन करण्यात आले. कीर्तनातील सामाजिक संदेशांनी उपस्थितांना विचार करण्यास भाग पाडले. उपस्थितांनी कीर्तनाचा मनापासून आनंद घेतला.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून नागनाथ पाटील, लक्ष्मणराव शिरगिरे, हनुमंतराव मुंडकर पाटील, सूर्यकांत पाटील शिंदे, इंजिनियर राजू गोनेकर,पत्रकार गंगाधर कुडके,कल्याण गायकवाड, बाबुराव बोधनकर सर, शिवराज शिंदे,कल्याण गायकवाड, नामदेव पाटील, गणपतराव पाटील, युसुफ शेख, ड. आकाश लघुळकर, रत्नदीप धोत्रे, लक्ष्मण मेहरेकर, बसवंन्ना बरबडे, साईनाथ छप्पेवार, शंकर सामंते, किरण बळगारे, कपिल पाटील हुंडेकर, अविनाश पाटील पतके, माधव पाटील, शंकर गायकवाड, सुरेश कुडकेकर, महालाईव्ह संपादक यादव रोकडे, सयाराम निदाने, लालबा दूमटकर, दत्तू दावलबाजे, मार्तंड जेठे, देविदास कोंडलाडे, विजय गायकवाड गंजगावकर, यादव कुडकेकर, भीमराव पाटील टेकाळे, रमेश पाटील शिंदे, विलास हावगारे, माधव मोरे, गंगाधर डोंगरे, संजय हावगारे, प्रकाश अंबेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहेबराव डोंगरे (पोलीस पाटील) यांनी प्रभावी शैलीत केले. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व मित्रमंडळी, पाहुणे व ग्रामस्थांनी सुरुची भोजनाचा लाभ घेत कु. प्रियदर्शिनी (साऊ) हिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संत स्वराज्य संविधान प्रतिष्ठान व शिवजन्मोत्सव समिती दौलापूर चे सर्व सदस्य, पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे विशेष योगदान लाभले.

शेवटी आयोजक बालाजी मोगलाजी यलगंदरे (दौलापूरकर) यांनी उपस्थित सर्व मान्यवर, मित्रपरिवार, पाहुणे मंडळी व ग्रामस्थांचे आभार मानले. समाजप्रबोधन, शिक्षणाचा गौरव आणि सामाजिक ऐक्य जपणारा हा उपक्रम दौलापूर परिसरात विशेष चर्चेचा विषय ठरला.

## संक्षिप्त वृत्त...

### त्या पोलिस कर्मचाऱ्याच्या अपघात प्रकरणाचा उलगडा : वाहनासह आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील झरी - बोरी रस्त्यावर घडलेल्या भीषण अपघात प्रकरणाचा स्थानिक गुन्हा शाखेने उलगडा केला असून या अपघातातील वाहनासह आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे.

२ मे रात्री ११:५० ते ३ मे पहाटे ३:३० वाजण्याच्या दरम्यान झरी - बोरी रस्त्यावर झरी शिवारात अपघात होऊन पोलिस कर्मचारी गंगाधर राणाप्रताप शिंदे यांच्या मृत्यू झाला होता. या अपघात प्रकरणी स्थानिक गुन्हा शाखेचे पथक झरी परिसरात आरोपीचा शोध घेत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून, आरोपी योगेश त्रिंबकराव रनेर (वय २८) यास अपघातातील छोटा हत्ती या वाहनासह डिग्रस (ता. परभणी) येथून ताब्यात घेण्यात आले. आरोपीची चौकशी केली असता त्याने अपघात प्रकरणाची कबुली दिली. तसेच भीतीपोटी घटनेची माहिती कुणालाही दिली नसल्याचे सांगितले. आरोपीकडून अपघात प्रकरणातील छोटा हत्ती टाटा एस वाहन क्रमांक एमएच २२ एएन २२४८ जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप, पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, पोलिस अंमलदार सिद्धेश्वर चाटे, राम पौळ, नामदेव डुबे, मुकेश बुधवंत, पांडुरंग तुपसुंदर, माणिक डुकरे, फड, घोंगडे, उमर, प्रमोद पुरी, जयश्री आव्हाड, हनवते, शेख आदींच्या पथकाने केली.

### झरी केंद्रातील कै. बाबारावजी बोबडे पाटील विद्यालयाचा दहावी परीक्षेत ९५ टक्के निकाल; शंकर पारदे प्रथम, विद्यार्थ्यांच्या यशाने परिसरात आनंदोत्सव

**झरी,/प्रतिनिधी :** झरी केंद्रातील सर्व शाळांमध्ये सर्वाधिक निकालाची परंपरा कायम राखत कै. बाबारावजी बोबडे पाटील माध्यमिक विद्यालयाने यंदाच्या दहावी परीक्षेतही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचा ९५ टक्के निकाल लागला असून सलग उत्कृष्ट निकालाची उज्वल परंपरा यंदाही कायम राखण्यात शाळेला यश आले आहे.

विद्यालयातील शंकर पारदे याने ९० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. राधिका जगाडे हिने ८१ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तर चैतन्य जाधव व वरद जाधव यांनी प्रत्येकी ८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांकावर बाजी मारली. याशिवाय विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य संपादन करून शाळेच्या यशात भर घातली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संतोष बोबडे, सचिव सौ. सिंधुताई बोबडे, मुख्याध्यापक विष्णु गावंडे तसेच बी. व्ही. कदम, पी. बी. कांबळे, आर. डी. भोसले, आर. जी. राठोड आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### सेलूतील नूतनची दहावीच्या निकालात यशस्वी भरारी
### प्रशालेतून प्राची प्रथम, महेश, मधूश्री, दर्शना द्वितीय

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचालित नूतन विद्यालयाचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ८७.५७ टक्के लागला असून प्रशालेने इयत्ता दहावी परीक्षेच्या निकालात यशस्वी भरारी घेतली आहे.

नूतन विद्यालयातील एकूण ५१५ विद्यार्थ्यांपैकी ४५१ विद्यार्थी दहावी परीक्षेत उत्तीर्ण झाले असून प्रशालेचा निकाल ८७.५७ टक्के लागला आहे. आपल्या यशस्वी निकालाची परंपरा कायम राखत नूतन विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्राची बाळासाहेब शिंदे ( ९७.२०), महेश राजेभाऊ गिराम (९६.६०), मधुश्री धनंजय आष्टीकर (९६.६०), दर्शना रेणुकादास जोशी (९६.६०), आर्या भाऊराव घांडगे ( ९६) टक्के घेऊन या विद्यार्थ्यांनी प्रशालेतून अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त केला. तर १९ विद्यार्थी ९० टक्के गुणांसह उत्तीर्ण झाले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस.एम.लोया, उपाध्यक्ष डी.के.देशपांडे, सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, सहसचिव जयप्रकाश बिहाणी, कार्यकारिणी सदस्य नंदकिशोर बाहेती, प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, शालेय समितीचे अध्यक्ष सिताराम मंत्री, मुख्याध्यापक संतोष पाटील, उपमुख्याध्यापक किरण देशपांडे, पर्यवेक्षक शंकर बोधनापोड, गणेश माळवे आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### दहावी परिक्षेत बाल विद्यामंदिर हायस्कूलचा ९७.८९ टक्के निकाल : तिघा विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण; ३१३ विद्यार्थ्यांनी मिळविले विशेष प्राविण्य

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील बाल विद्यामंदिर हायस्कूल प्रशालेने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेत ९७.८९ टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

प्रशालेतील कु. पायल बंडू डहाळे, कु. मृण्मयी संतोष वाईकर आणि चि. ओम ज्ञानेश्वर फड या तिन्ही विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण प्राप्त करून विशेष यश मिळविले. तसेच निकालात ३१३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, १०३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, ५६ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर १५ विद्यार्थ्यांनी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण होत यश संपादन केले.

या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकवृंदाचे संस्थाध्यक्ष डॉ. नंदकुमार झरकर, उपाध्यक्ष ॲड. विलास पोहंडूळकर, सचिव डॉ. विवेक नावंदर, सहसचिव ॲड. संजय देशपांडे, कोषाध्यक्ष विनय नावंदर, सदस्य ॲड. अशोक सोनी, पवनकुमार झांजरी, मल्हार विहीटकर, सदस्या डॉ. सौ. अनिता विवेक नावंदर, मुख्याध्यापक तथा प्राचार्य अरुण बोराडे, उपमुख्याध्यापक रामदास तुम्मेवार, पर्यवेक्षक प्रदीप रूघे, बळीराम कोपरटकर, सीमा बोके तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

### मालतीबाई गाजरे यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील रामकृष्ण नगर येथील रहिवासी श्रीमती मालतीबाई वसंतराव गाजरे यांचे शुक्रवार ८ मे रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सुन, नातवंडे असा परीवार आहे. रामकृष्ण नगर येथील गुरुकृपा डे केअर आणि बालवाडीचे संचालक सौ. गायत्री आपटे गाजरे यांच्या त्या सासूबाई तर संतोष गाजरे यांच्या त्या आई होत. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी जिंतूर रोडवरील वैंकुठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पत्नीचा निर्घृण खून करणाऱ्या आरोपीस आजन्म कारावासाची शिक्षा : जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय : पूर्णा तालुक्यातील कमलापूर येथील सौ. आशाबाई मोरे खून प्रकरण

**पुर्णा ,/प्रतिनिधी:-** स्वतःच्या पत्नीचा ऊसतोडीच्या कोयत्याने डोक्यावर, तोंडावर सपासप वार करीत निर्घृण खून करणाऱ्या केशव गोविंदराव मोरे या कमलापूर (ता.पूर्णा) येथील आरोपीस जिल्हा व सत्र न्यायाधीश एन.पी. त्रिभूवन यांनी आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावली.

कमलापूर येथील व्यंकटी गोविंदराव मोरे यांनी ३० नोव्हेंबर २०२२ रोजी ताडकळस पोलिस ठाण्यात एक तक्रार दाखल केली. त्याद्वारे, केशव गोविंदराव मोरे याने त्याच्या हातातील ऊस तोडीच्या कोयत्याने त्याची पत्नी आशाबाई हिच्या तोंडावर व डोक्यावर तीचे डोके पूर्ण फुटून चेंदामेंदा होईपर्यंत सपासप वार केले. अन् तीचा निर्घृण खून केला. तो प्रकार केशव याच्या मुलीसह आपण पाहिला. त्याला धरण्याचा प्रयत्न केला. परंतु, केशवचा अवतार पाहून व त्याच्या हातातील कोयता पाहून आमची त्याच्याजवळ जाण्याची हिम्मत झाली नाही. केशव आमच्यावरच चाल करुन येत असल्याने आपण, बंधू शंकरसह मदतीसाठी गावात पळालो, त्यावेळी केशव हा हातात कोयता घेऊन जोरजोरात ओरडत होता, असे नमूद केले. मुलासह नातेवाईक धाऊन आल्यानंतर आपणास केशव आणि त्याची मयत पत्नी आशाबाई यांच्यात शेतीला पाणी देण्यासाठी न जाण्याच्या कारणावरुन कडाक्याचे भांडण झाल्याचे कारण समोर आले.

दरम्यान, या प्रकरणात ताडकळस पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली तेव्हा घरासमोरील अंगणात सौ. आशाबाई हीचा मुंडके मानेपासून धडावेगळ्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. डोक्यावर आणि चेहऱ्यावर कोयत्याने अनेक वार केल्याने चेहरा चेंदामेंदा झाल्याने ओळखू येत नव्हता. अंगणात व घरात सर्वत्र रक्त पडले होते.

ताडकळस पोलिसांनी तात्काळ पंचनामे करीत आरोपीस ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला. सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय रामोड यांनी या प्रकरणात सर्व पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. जिल्हा व सत्र न्यायाधीश त्रिभूवन यांच्यासमोर अंडर ट्रायल खटला चालला. या प्रकरणात सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. नितीन खळीकर यांनी सरकार पक्षातर्फे बाजू मांडली. सरकार पक्षाकडून एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले. ज्यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, फिर्यादी, मयताची मुलगी, वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली. या प्रकरणात संबंधित आरोपीने त्याच्या बचावाकामी तो मनोरुग्ण असल्याचा बचावात्मक पवित्रा घेतला. परंतु, तो मनोरुग्ण नसल्याबाबत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आरोपीचा मुलगा-मुलगी व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी साक्षीतून सिध्द केले. न्यायालयाने या प्रकरणात आरोपी केशव मोरे यास भादंवि कलम ३०२ अन्वये आजन्म कारावास, २००० रुपये दंड व दंड न भरल्यास चार महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली. दरम्यान, या प्रकरणात मुख्य सरकारी अभियोक्ता ॲड. ज्ञानोबा दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. खळीकर यांनी सरकार पक्षातर्फे बाजू मांडली. जिल्हा पोलिस अधिक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक सुरज चव्हाण, पैरवी पोलिस शिपाई पुष्पा जवादे, शिवरत्न शिंदे, वंदना आदोडे, सचिन धबडगे यांनी काम पाहिले.

## ई-फार्मसी विरोधात औषध विक्रेत्यांद्वारे कडकडीत बंद : शहरासह जिल्ह्यातील चित्र : प्रशासनास निवेदन : ऑनलाईन विक्री, किंमत धोरण व अधिसूचना माघारी घेण्याची मागणी

**परभणी./प्रतिनिधी:** ई-फार्मसी विरोधात औषध विक्रेत्यांद्वारे कडकडीत बंद : शहरासह जिल्ह्यातील चित्र : प्रशासनास निवेदन : ऑनलाईन विक्री, किंमत धोरण व अधिसूचना माघारी घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

ऑनलाइन औषधविक्रीतील (ई-फार्मसी) वाढ, मोठ्या कंपन्यांचे किंमत धोरण तसेच जीएसआर २२० (ई) व जीएसआर ८१७ (ई) या अधिसूचना मागे घ्यावी, या मागणीसाठी अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेने २० मे रोजी पुकारलेल्या एक दिवसीय देशव्यापी बंद आंदोलनास परभणी महानगरासह जिल्ह्यात जोरदार प्रतिसाद मिळाला.

महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशन आणि ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट यांनी आपल्या मागण्यांसंदर्भात निवेदन प्रसिद्ध केले होते. देशभरातील सुमारे १२ लाख ४० हजार औषध विक्रेत्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या संघटनांच्या विविध मागण्या शासन दरबारी निर्णयाविना अद्याप प्रलंबित आहेत, हे निदर्शनास आणून दिले होते. विशेषतः ई- फार्मसीद्वारे औषध विक्री करतांना वैद्यकीय प्रिस्क्रिप्शनची योग्य तपासणी न करता मोठ्या प्रमाणावर औषधे दिली जात आहेत. यामुळे स्व-औषधोपचाराचे प्रमाण झपाट्याने वाढत असून नागरिक नकळत स्वतःच्या आरोग्याशी खेळ करत आहेत. तज्ज्ञांच्या मते, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतलेली औषधे अनेकदा दुष्परिणामकारक ठरु शकतात, त्यामुळे दीर्घकालीन आजार वाढण्याची शक्यता आहे, असे या संघटनेने म्हटले होते.

याशिवाय मोठ्या कंपन्यांकडून कमी दरात औषध विक्री होत असल्याने लहान औषध विक्रेते आर्थिक अडचणीत सापडत असल्याचेही या संघटनांनी नमूद केले. सरकारने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. या अनुषंगानेच २० मे रोजी संपूर्ण देशभरातील औषध विक्रेते एक दिवशीय आंदोलन करीत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत आहोत, असे संघटनांनी नमूद केले.

दरम्यान, महानगरासह जिल्ह्यातील संतप्त औषध विक्रेत्यांनी संघटनांनी पुकारलेल्या या आंदोलनास जोरदार प्रतिसाद दिला. संपूर्ण शहरात सर्वदूर औषधी दुकाने दिवसभर पूर्णतः बंद होती. या दरम्यान, जिल्हा केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संजय मंत्री, सचिव सूर्यकांत हाके, कोषाध्यक्ष पवन झांजरी यांच्यासह अन्य औषध विक्रेत्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी यांची भेट घेऊन तपशीलवार निवेदन सादर केले. या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## पाथरीतील दुचाकीस्वाराचा ट्रकने दिलेल्या धडकेत मृत्यू : रुढी पाटीजवळील दुर्दैवी घटना

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी ते पाथरी या राष्ट्रीय महामार्गावर रुढी पाटीजवळ एका मालवाहू ट्रकने दिलेल्या पाथरीतील स्वप्निल मानवतकर यांचा मृत्यू झाला. ही दुर्देवी घटना मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास घडली.

मानवतकर हे एम.एच. २२ बी. १६६२ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन परभणीहून पाथरीकडे जात होते. त्यावेळी रुढी पाटीजवळील एका जिनिंगसमोर भरधाव वेगाने मानवतहून परभणीकडे जाणाऱ्या एम.एच. १२ एन.एक्स १७८९ या क्रमांकाच्या मालवाहू ट्रकने त्यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. त्यात मानवतकर हे जागीच मृत्यू पावले. प्रत्यक्षदर्शींनी घटनास्थळी धाव घेऊन ट्रकचालकास ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्या चालकाने तो ट्रकसह घटनास्थळावरुन पोबारा केला.

दरम्यान, पाथरी येथील प्रसिध्द वैद्यकीय व्यवसायिक श्रीकांत मानवतकर यांचे स्वप्निल मानवतकर हे सुपूत्र होत. त्यांच्या या दुर्देवी निधनाने पाथरीत मोठी शोककळा पसरली.

## देशव्यापी बंदला सेलूत उत्स्फूर्त प्रतिसाद

**सेलू,/प्रतिनिधी:** अखिल भारतीय केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट असोसिएशन यांच्या वतीने २० मे रोजी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी बंदला सेलू शहर व तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या बंदमध्ये सेलू तालुक्यातील सर्व केमिस्ट व्यावसायिकांनी सक्रिय सहभाग नोंदवत कडकडीत बंद पाळला.

सर्व केमिस्ट सदस्य एकत्र येत शहरातून मूक मोर्चा काढण्यात आला. मोर्चानंतर परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर तसेच सेलू येथील उपविभागीय अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या आंदोलनात केमिस्ट असोसिएशन सेलू तालुका अध्यक्ष संदीप टाक, सचिव केदार गजमल, कैलास काळे, गणेश साडेगावकर, लक्ष्मण पौळ, शिवनारायण मालानी, जयप्रकाश झंवर, प्रकाश कदम यांच्यासह सेलू तालुक्यातील बहुसंख्य केमिस्ट सदस्य उपस्थित होते.

### शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत आ. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली शिक्षमंत्र्यांची भेट : अनुदान, आरटीई देयके व पेन्शन योजनांसह विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णयाची अपेक्षा

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्यातील शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार २० मे रोजी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसमोरील विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले. बैठकीत राज्यातील १२६२ शाळा आणि ८२७ तुकड्यांना शासनाने अनुदानासाठी कायमस्वरूपी अपात्र ठरविण्याचा आदेश रद्द करूकेलेआहेत.

## ई-फार्मसी विरोधात औषध विक्रेत्यांद्वारे कडकडीत बंद : शहरासह जिल्ह्यातील चित्र : प्रशासनास निवेदन : ऑनलाईन विक्री, किंमत धोरण व अधिसूचना माघारी घेण्याची मागणी

**परभणी/प्रतिनिधी:** ऑनलाइन औषधविक्रीतील (ई-फार्मसी) वाढ, मोठ्या कंपन्यांचे किंमत धोरण तसेच जीएसआर २२० (ई) व जीएसआर ८१७ (ई) या अधिसूचना मागे घ्यावी, या मागणीसाठी अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेने २० मे रोजी पुकारलेल्या एक दिवसीय देशव्यापी बंद आंदोलनास परभणी महानगरासह जिल्ह्यात जोरदार प्रतिसाद मिळाला.

महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशन आणि ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट यांनी आपल्या मागण्यांसंदर्भात निवेदन प्रसिद्ध केले होते. देशभरातील सुमारे १२ लाख ४० हजार औषध विक्रेत्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या संघटनांच्या विविध मागण्या शासन दरबारी निर्णयाविना अद्याप प्रलंबित आहेत, हे निदर्शनास आणून दिले होते. विशेषतः ई-फार्मसीद्वारे औषध विक्री करतांना वैद्यकीय प्रिस्क्रिप्शनची योग्य तपासणी न करता मोठ्या प्रमाणावर औषधे दिली जात आहेत. यामुळे स्व-औषधोपचाराचे प्रमाण झपाट्याने वाढत असून नागरिक नकळत स्वतःच्या आरोग्याशी खेळ करत आहेत. तज्ज्ञांच्या मते, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतलेली औषधे अनेकदा दुष्परिणामकारक ठरु शकतात, त्यामुळे दीर्घकालीन आजार वाढण्याची शक्यता आहे, असे या संघटनेने म्हटले होते.

याशिवाय मोठ्या कंपन्यांकडून कमी दरात औषध विक्री होत असल्याने लहान औषध विक्रेते आर्थिक अडचणीत सापडत असल्याचेही या संघटनांनी नमूद केले. सरकारने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. या अनुषंगानेच २० मे रोजी संपूर्ण देशभरातील औषध विक्रेते एक दिवशीय आंदोलन करीत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत आहोत, असे संघटनांनी नमूद केले.

दरम्यान, महानगरासह जिल्ह्यातील संतप्त औषध विक्रेत्यांनी संघटनांनी पुकारलेल्या या आंदोलनास जोरदार प्रतिसाद दिला. संपूर्ण शहरात सर्वदूर औषधी दुकाने दिवसभर पूर्णतः बंद होती. या दरम्यान, जिल्हा केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संजय मंत्री, सचिव सूर्यकांत हाके, कोषाध्यक्ष पवन झांजरी यांच्यासह अन्य औषध विक्रेत्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी यांची भेट घेऊन तपशीलवार निवेदन सादर केले. या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# सेलूत ७२ प्रगणक १३ पर्यवेक्षक करताहेत घरगणना : जनगणनेसाठी सहकार्य करा : नगर परिषदेद्वारे नागरीकांना आवाहन

**सेलू,/प्रतिनिधी:** सेलूत ७२ प्रगणक १३ पर्यवेक्षक करताहेत घरगणना : जनगणनेसाठी सहकार्य करा : नगर परिषदेद्वारे नागरीकांना आवाहन करण्यात आले आहे.

जनगणनेतून जनकल्याण या उद्देशाने १६ वी जनगणना - २०२७ ला मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. सेलू नगर परिषदेच्या वतीने शनिवार १६ मे पासून घरगणनेला सुरुवात करण्यात आली असून याकरीता ७२ प्रगणक १३ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सुरवातीला तीन टप्प्यांत प्रगणक आणि पर्यवेक्षकांना जनगणनेसाठी प्रशिक्षण देण्यात आले. आपल्या हक्काच्या उन्हाळी सुट्ट्या बाजूला सारून शिक्षक ४३ अंश सेल्सिअस तापमानातही आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावत आहेत. नगर परिषद प्रशासनाने जनगणनेसाठी ७२ प्रगणक आणि १३ पर्यवेक्षकांची नियुक्ती केली आहे. पहिल्या टप्प्यात १६ मे ते १४ जून या कालावधीत घरगणना होणार आहे. पहिल्यांदाच ही जनगणना ऑनलाईन होणार आहे. शहरातील जनतेने आपल्या घरी आलेल्या शिक्षक - प्रगणक, पर्यवेक्षकांना जनगणनेसाठी सहकार्य करावे. शासनाने जणगननेसाठी नियुक्त केलेले सर्व अधिकारी व कर्मचारी अनुभवी प्रशिक्षीत व जबाबदार आहेत. त्यामुळे ते विचारत असलेल्या प्रश्नांना योग्य उत्तरे द्यावीत, नागरीकांची संकलीत केल्या जाणाऱ्या माहितीची गुप्तता पाळण्या बाबत सर्वसंबंधितांना आदेशीत करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी निःसंकोचपणे कर्मचाऱ्यांना माहिती सांगावी, असे आवाहन नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा चार्ज जनगणना अधिकारी महेश गायकवाड, अतिरिक्त चार्ज जनगणना अधिकारी विजय शहाणे, नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी भगवान चव्हाण यांनी केले आहे.

जनगणनेच्या नोंदणीसाठी आवश्यक किटचे वाटप नगर परिषदेच्या वतीने करण्यात आले. या प्रसंगी किशोर कटारे, सुभाष मोहकरे, डॉ. सुरेश हिवाळे,पवन गिराम, भगवान पावडे, गजानन मुळी आणि प्रगणक, पर्यवेक्षक उपस्थित होते. जनगणना लिपिक नंदकिशोर दायमा, पुरूषोत्तम चोबे, तांत्रिक सहायक हर्षवर्धन शिंदे, अक्षय कदम, रंगरेज अन्सारी, आनंद काबरा हे नगर परिषदेचे कर्मचारी प्रगणक, पर्यवेक्षकसह जनगणना यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

जणगणनेसाठी प्रगणकांना सहकार्य करण्याचे आवाहन...

आपल्या शहरात पहिल्या टप्प्यात प्रगणक घर नोंदणीसाठी येत आहेत. जनगणना करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. ज्यांनी स्वगणना केली असेल त्यांनी आपल्या घरी आलेल्या प्रगणकास आपला स्वगणना क्रमांक द्यावा. घर गणनेचे काम पूर्णत्वाकडे असून प्रत्यक्ष जनगणनेच्या कार्याला देखील ऑनलाईन पद्धतीने प्रारंभ झाला आहे. आपल्या घरी आलेल्या शिक्षक प्रगणकास जनगणनेसाठी सकारात्मक प्रतिसाद देऊन आपली नोंदणी करावी. असे आवाहन अतिरिक्त चार्ज जनगणना अधिकारी विजय शहाणे यांनी केले आहे.